अहवाल क्रमांक : १७६

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

### महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या बीड जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत

# तिसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १ जुलै, २०१९ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या बीड जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# तिसावा अहवाल

# पंचायती राज समिती

## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

**(१)** श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) *** रिक्त
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) *** रिक्त
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) * श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(३०) ** श्री. निलय नाईक, वि.प.स.
(३१) ** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा.डॉ.तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. ** रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठित करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची ' कार्यकारी समिती प्रमुख ' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा ' समिती प्रमुख ' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा तिसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्याउलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे. विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्त्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय, योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय, योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना

आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशुवैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने बीड जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने बीड जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११ व १२ जानेवारी, २०१८ रोजी भेट देऊन श्री. धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १, ८, ९ व १६ जानेवारी, २०१९ रोजी जिल्हा परिषद, बीड संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.रा.वा.पानसे, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, श्री. चं. प्र. जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.भा.र.गावित, सह सचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभाग, श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.र.आ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गिरिष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. गो. भ. शिंदे, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. विजय कुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्री. दि. रा. टकले, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, श्री. सतिश सोनी, आयुक्त, सहकार विभाग, श्री. एस. एल. अहिरे, संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, श्री. विजय कुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, डॉ. एस. एन. जाधव, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या बीड जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २७ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २७ जून, २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | नवीन महिंद्रा बोलेरो कंपनीची वाहने खरेदीबाबत (सन २०१२-१३) | ३.५९ | १ |
| (२) | दोन | कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश बनावट असल्याबाबत (सन २०१२-१३) | ३.२०२ | ९ |
| (३) | तीन | राष्ट्रीय पेयजल व महाजल योजनाअंतर्गत कामातील अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.५७३ | १५ |
| (४) | चार | रुखमाई गोविंद मतीमंद निवासी विद्यालय ने देयकातून कपात रक्कम शासनखाती भरणा न करणे व इतर अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.९१७ | २२ |
| (५) | पाच | तांडावस्ती सुधार योजनेतील अनियमिततेबाबत (सन २०१२-१३) | ३.९१८/२३ | ३१ |
| (६) | सहा | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणेबाबत (सन २०१२-१३) | | ३६ |
| (७) | सात | सर्वसाधारण शिफारशी | | ५५ |
| | | **परिशिष्ट (अ)** **शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके** | | ५९ |
| | | **परिशिष्ट (ब)** **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | ६५ |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, बीड
## नवीन महिंद्रा बोलेरो कंपनीची वाहने खरेदी बाबत

**परिच्छेद क्रमांक ३.५९ (सन २०१२-१३)**

जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमधून नवीन महिंद्रा कंपनीच्या बोलेरो-५ गाड्या/वाहने खरेदीसाठी रुपये २९,३०,५००/- इतका खर्च सन २०१२-१३ मध्ये केलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) जिल्हा परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभा ठराव क्र.११८, दिनांक २५ मार्च, २०१३ अन्वये पंचायत समित्यांसाठी घसारा निधीतून वाहन खरेदीसाठी मान्यता देण्यात आली असताना नवीन वाहन खरेदी जिल्हा परिषद स्वनिधी मधून करण्यात आली.

(२) जुनी वाहने निर्लेखित न करता नवीन वाहने खरेदी केली आहेत. निर्लेखनास विभागीय आयुक्त यांची मान्यता असून निर्लेखन केले नाही.

(३) वाहने सुव्यवस्थित प्राप्त झालेबाबत विभाग प्रमुखांचे प्रमाणपत्र नाही. तसेच अदायीची पावती घेतलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

(१) मा. विभागीय आयुक्त , औरंगाबाद यांनी आदेश क्र.२०१३/विशा/कक्ष-५/वाहन/सीआर-११६/१५०/१३, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ अन्वये नवीन वाहने घसारा निधी अथवा स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी करावीत या अटीवर मान्यता दिली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या स्वनिधी मधून वाहने खरेदी करण्यात आली. सोबत मा. आयुक्त यांच्या आदेशाची प्रत अवलोकनार्थ सादर.

(२) निर्लेखीत केलेल्या जुन्या वाहनांचा लिलाव दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी करण्यात आला व वाहने निकाली काढण्यात आली आहेत. सोबत प्रत अवलोकनास्तव सादर.

(३) वाहने सुव्यवस्थित प्राप्त झाले बाबत विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र देयकावर घेण्यात आले आहे. सोबत प्रत अवलोकनास्तव सादर. तसेच कंपनीने दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी अदायीची पावती दिली आहे. सोबत प्रत अवलोकनास्तव सादर.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, घसारा निधीऐवजी जिल्हा परिषद उपकर निधीमधून वाहन खरेदीस जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली आहे काय, घसारा निधीऐवजी जिल्हा परिषद निधीतून वाहन खरेदी करण्याचे प्रयोजन काय, निधी अभावी विकास कामांवर परिणाम झाला नाही काय, आयुक्तांकडून निर्लेखनास मंजूरी केव्हा प्राप्त झाली आहे, वेळीच वाहनांचे निर्लेखन केले असते तर वाहनांची वाजवी किंमत प्राप्त झाली नसती काय, विलंबाने निर्लेखन करण्याचे प्रयोजन काय, जिल्हा परिषदेच्या निधीतून वाहने खरेदी करण्यासंदर्भातील हा विषय आहे. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे हा नियम आहे. जिल्हा परिषदेने आपल्या उपकरातून ही वाहने खरेदी केली, परंतु यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली होती काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ५ पंचायत समित्यांसाठी ५ गाड्या घेतलेल्या आहेत. अंबाजोगाई, पाटोदा, आष्टी या पंचायत समित्यांची वाहने जुनी झाली होती. सन २००२ मध्ये १ वाहन आणि सन १९९७ मध्ये ५ वाहने घेतली होती.

आयुक्तांकडे याबाबतचा प्रस्ताव दिला होता. दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. या विषयाशी संबंधित ठराव क्रमांक ११७ आहे. लेखा आक्षेप निघाला त्यावेळी दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी सर्वसाधारण सभा घेतली होती. घसारा निधी १८ लाख ३९ हजार रुपये ही शिल्लक रक्कम कमी होती. जिल्हा परिषदेचा निधी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत होता, परंतु माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये अडचण झाली होती. १७४ कोटी ८३ लाख १६ हजार रुपये डीसीसी बँकेत चालू खाते होते. त्यामुळे अडचण झाली होती. तो निधी जिल्हा परिषदेला मिळालेला नाही म्हणून घसारा निधीतून खर्च करता आला नाही. सदरचा प्रस्ताव आयुक्तांकडे दिला होता. आयुक्तांनी तशी परवानगी दिलेली आहे. दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजीचे आयुक्तांचे परवानगीचे पत्र आलेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, जेव्हा आक्षेप निघाला तेव्हा जिल्हा परिषदेच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी आपण जिल्हा परिषदेला अंधारात ठेवण्याचे काम केलेले आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बंधनकारक असताना ती आपण घेतली नाही, असा लेखा आक्षेप आलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लेखा परिक्षणाच्या वेळेस संबंधित नस्ती कदाचित दाखविली नसेल. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत हा विषय घेतलेला आहे.यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने स्वनिधीतून रक्कम खर्च करण्याचा ठराव केलेला होता. असा ठराव घेतला असेल तर ते जिल्हा परिषदेला अवगत करणे आवश्यक होते, परंतु आपण ते का केले नाही, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या बजेटमध्ये सुधारित ३० लाख रुपये पंचायत समित्यांना वाहन खर्च या बाबींसाठी तरतूद केली होती.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम केलेले आहे. यामध्ये कोण दोषी आहेत, जिल्हा परिषदेची दिशाभूल करण्याचे काम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी आलेले असून, त्यांना उत्तर देण्याची परवानगी देण्यात यावी. यावर तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मी सदरहू नस्ती पाहिलेली नसल्यामुळे मला उत्तर देणे शक्य होणार नाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, समिती बीड जिल्हापरिषदेत अभ्यास दौऱ्यासाठी येणार आहे, अशा प्रकारचे पत्र दोन ते तीन महिन्यापूर्वी देण्यात आले होते. असे असताना संबंधित अधिकारी मला बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र ४ ते ५ दिवसापूर्वी दिलेले आहे असे उत्तर जर देत असतील तर ते बरोबर नाही. समिती येणार म्हणून निवारक सर्व गोष्टी करणे अपेक्षित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व संबंधितांसमवेत पूर्वचर्चा करणे आवश्यक होते.

ज्या अर्थी तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बोलाविले आहे, त्याअर्थी विषयाच्या अनुषंगाने अभ्यास किंवा तयारी करून समितीच्या बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य होते. आपण केवळ या ठिकाणी हजर राहून उत्तर देणार नसतील तर ते बरोबर नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ज्या अधिकाऱ्यांचे विषय आहेत, अशा अधिकाऱ्यांसमवेत समन्वय ठेऊन एखादी बैठक आयोजित केलेली आहे काय, यासंदर्भात जबाबदारी नेमकी कोणाची आहे, जिल्हा परिषद बीडने संपूर्ण माहिती दिलेली नाही. जिल्हा परिषद बीडने माहिती लपविण्याचे काम केल्याचे दिसून येत आहे. अनुपालन अहवालात संपूर्ण इथ्यंभूत माहिती दिलेली नाही.

यावर समितीने विचारणा केली की, तत्कालिन अधिकारी आणि विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीला विसंगत उत्तरे दिली जात आहेत. त्यामुळे समितीचा बहुमूल्य वेळ वाया जात आहे. याबद्‌ल समितीने खेद व्यक्त केला. जिल्हा परिषदेचा ठराव घेतलेला नाही. जिल्हा परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभा ठरावान्वये पंचायत समित्यांसाठी घसारा निधीतून वाहन खरेदीसाठी मान्यता देण्यात आली असताना नवीन वाहन खरेदी जिल्हा परिषद स्वनिधीमधून करण्यात आली. तसेच जुनी वाहने निर्लेखित न करता नवीन वाहने खरेदी केली आहेत. निर्लेखनास विभागीय आयुक्त यांची मान्यता असून, निर्लेखन केले नाही, असा आक्षेप आहे. यासाठी संबंधित अधिकारी यांनी जिल्हा परिषदेला अंधारात ठेवण्याचे काम

केलेले असून, ते कारवाईस पात्र आहेत असे मत समितीने व्यक्त केले. या प्रकरणी अनियमितता झालेली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, माननीय विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या आदेशानुसार नवीन वाहने घसारा निधी अथवा स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी करण्याच्या अटीवर मान्यता दिली होती.

यावर समितीने विचारणा केली की, समितीच्या मते या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची चूक झालेली आहे असे दिसून येते. तसेच तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी हे अनुभवी आहेत. तसेच त्यांना या विषयाची संपूर्ण माहिती आहे. त्यांनी जिल्हा परिषदेची दिशाभूल केलेली आहे. निर्लेखन करण्यास दोन वर्षाचा उशिर झालेला आहे. घसाऱ्याच्या संदर्भात वाहनांची किंमत देखील कमी आलेली आहे. या प्रकरणी अनियमितता झालेली असेल तर त्यासाठी संबंधित अधिकाऱ्याची चौकशी केल्यानंतर जर ते दोषी आढळतील तर त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा, अशी समितीची सूचना आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, माननीय समिती प्रमुखांनी दिलेल्या निदेशानुसार पुढील कारवाई नियमानुसार केली जाणार आहे आणि त्यासंदर्भातील अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर केला जाईल. यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेत १७४ कोटी रुपये आहेत, अशी माहिती दिलेली आहे. त्या काळात घसारा निधी १८ लाख रुपये प्रलंबित होता. म्हणून उपकर निधीतून वाहने खरेदी केली आहेत. ३० लाख रुपयांचा निधी कोणत्या खात्यामध्ये होता. जिल्हा मध्यवर्ती बँकेत १७४ कोटी रुपये अडकलेले असून, ते वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेने आतापर्यंत कोणते प्रयत्न केलेले आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडचण निर्माण झाल्यानंतर SBS बँकेत खाते उघडले होते. १७४ कोटी रुपये वसूल करण्यासाठी बँकेकडे वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. १५ दिवसापूर्वी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसमवेत जिल्हा परिषदेची बैठक झालेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पीक कर्जमाफीसाठी मोठ्या प्रमाणात पैसा मिळणार आहे. त्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने काही प्रमाणात पैसा दिला जाईल असे आश्वासन दिलेले आहे. परंतु, सद्यःस्थितीत पैसा मिळालेला नाही.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून जिल्हा परिषदेला पैसा मिळणार नाहीत. जिल्हा सहकारी बँकेचा संचित तोटा किती आहे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत १७४ कोटी रुपये अडकलेले असून, ते वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेने आतापर्यंत कोणते प्रयत्न केलेले आहेत, १७४ कोटी रुपये कोणकोणत्या लेखाशीर्षमध्ये आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सामान्य प्रशासन विभागाचे ८ कोटी ७४ लाख रुपये, पंचायत विभागाचे ८६ लाख ५६ हजार रुपये, शिक्षण विभागाचे ८४ कोटी ५९ लाख रुपये, कृषी विभागाचे ८६ लाख रुपये, आरोग्य विभागाचे ५६ कोटी १८ लाख रुपये, पशुसंवर्धन विभागाचे १ कोटी ९४ लाख रुपये, समाजकल्याण विभागाचे ९७ लाख ४६ हजार रुपये, महिला बालकल्याण विभागाचे १६ कोटी १४ लाख रुपये आहेत. यासंदर्भातील टिप्पणी समितीला सादर करण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षण विभागाचे ८४ कोटी ५९ लाख रुपये आणि आरोग्य विभागाचे ५६ कोटी १८ लाख रुपये आहेत, अशी माहिती दिलेली आहे. यामध्ये शिक्षकांचे पगार होते काय, हा पैसा वसूल केला नसल्यास शिक्षकांचे पगार झालेले आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची अडचण निर्माण झाल्यामुळे शिक्षकांच्या पगारासाठी शासनाकडे अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आली होती. सदर मागणीतून शिक्षकांचे पगार केलेले आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा मध्यवर्ती बँकेत १७४ कोटी रुपये अडकलेले असून, ते वसूल करण्यासाठी जिल्हा परिषदेने आतापर्यंत कोणते प्रयत्न केलेले आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला

की, बँकेत बचत खात्यामध्ये पैसे आहेत. ते मुदत ठेवीच्या स्वरुपात समजून जिल्हा परिषदेला व्याज देण्याबाबत विनंती केलेली आहे. पैसे वसूल करण्यासाठी वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. बँकेने हप्त्या-हप्त्यांमध्ये पैसे देण्याचे आश्वासन दिलेले आहे. पैसे वसूल करण्यासाठी दावे दाखल केले आहेत. पैसे वसूल करण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा केला जात आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बीड जिल्हा परिषदेचे बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकमध्ये अडकलेले रुपये १७४ कोटी वसूल करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मध्ये जिल्हा परिषद बीडचा विभाग निहाय एकूण रक्कम रुपये १७४,८३,१६,०००/- (एकशे चौऱ्याहत्तर कोटी त्र्यैंशी लक्ष सोळा हजार) इतका निधी अडकलेला आहे.

(१) लोकलेखा समितीच्या साक्षीच्या अनुषंगाने दिनांक २५ जानेवारी, २०१६ व दिनांक १६ मे, २०१६ चे पत्रान्वये ग्रामविकास विभागास वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे.

(२) दिनांक १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी जिल्हा परिषदेने पत्र देवून दिनांक १ ऑक्टोबर, २०११ पासून बँकेत जमा रक्कम १७४,८३,१६,०००/- मुदत ठेवीच्या प्रचलित दराने व्याज देवून व्याजासहित संपूर्ण रक्कम या कार्यालयास रीतसर परत करण्याबाबत लेखी कळविले आहे.

(३) या बाबत जिल्हा परिषदेने दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी विधिज्ञ नियुक्त करण्यात येऊन अडकलेला निधी परत जिल्हा परिषदेस कसा मिळवता येईल याबाबत कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आले होते.

(४) दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ च्या पत्रान्वये विधिज्ञामार्फत बँक व्यवस्थापनास पुन्हा अडकलेल्या निधीबाबत त्याच्या गांभीर्याबाबत अवगत करण्यात येऊन निधी तत्काळ परत करण्यात यावा याबाबत सुचीत करण्यात आले आहे. निधी परत न केल्यास न्यायालयीन कार्यवाही करण्याबाबतही बँक प्रशासन सुचना देण्यात आली होती.

(५) त्या अनुषंगाने बँक व्यवस्थापनाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी जिल्हा परिषद बीड यांना पत्र देऊन कळविले आहे की, त्यांनी शासनाकडे अनुदानाकरिता निधीची मागणी केलेली असून तो प्राप्त होताच जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी परत करण्यात येईल असे कळविले आहे.

सदरचा अडकेलेला निधी परत मिळणेसाठी विधिज्ञ यांच्या मार्फत न्यायालयीन कार्यवाही करण्यात येत आहे. सदरील रक्कम बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून परत मिळणेसाठी मा.उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सहकार विभागाचे अभिप्राय :-** दिनांक ३१ मार्च, २०११ अखेर बँककडे बीड जिल्हा परिषदेचा रुपये २०३.१४ कोटी एवढा निधी होता बँकेने बीड जिल्हा परिषदेस वेळोवेळी बँकेकडे असलेल्या उपलब्ध निधीतून दिनांक १ एप्रिल, २०११ ते दिनांक ३१ मार्च, २०१८ या कालावधीत रुपये २९.१५ कोटी एवढा निधी परत केला आहे. दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ अखेर बीड जिल्हा परिषदेचा बँकेकडे रुपये १७५.५३ कोटी एवढा निधी विविध खात्यावर शिल्लक दिसत आहे.

बँकेने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर एकूण रुपये १०८९ कोटी ३४ लाखाचे कर्ज येणे बाकी असून त्याच प्रमाण ८४.३५ टक्के आहे. बँकेच्या पीक कर्जाची रुपये ८७३ कोटी ०६ लाख थकबाकी असून थकबाकीचे प्रमाण ९५.०२ टक्के आहे.

जिल्ह्यामध्ये गत ४-५ वर्षापासून सतत दुष्काळजन्य परिस्थिती असल्याकारणाने राज्य शासनाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ च्या आदेशान्वये शेतीशी निगडीत असलेल्या कर्जाची वसुलीस स्थगिती दिलेली होती. त्यामुळे बहुतांशी बँकेचा निधी पीक कर्जवाटपामध्ये अडकला आहे. तसेच शेतकऱ्यांना कर्ज माफी होणार असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमातून सतत येत असल्याने व शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफीची अपेक्षा असल्याने शेतकऱ्यांकडील पीक कर्जाची थकबाकी भरण्यास शेतकऱ्यांची मानसिकता राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडील वसुलीस अडचणी येत आहेत. त्यामुळे कर्ज वसुलीतून बँकेकडे पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये कारवाईस पात्र असलेल्या ३५५ संस्थांकडे रुपये १४,१९५.४५/- लाख थकबाकी असून त्यापैकी १०९ थकीत संस्थेवर व संस्थेच्या संचालकांवर कलम ९१ ची वसुली दावे मा.सहकार न्यायालय, लातूर येथे दाखल केली आहेत. मा. सहकार न्यायालयात दाखल केलेल्या वसुली दाव्यांपैकी एकूण ८३ दाव्यांमध्ये मा.सहकार न्यायालयाने डिक्री दिलेली आहे. मा.सहकार न्यायालयाने दिलेल्या डिक्री प्रमाणे वसुली करणेसाठी मा. दिवाणी न्यायालयात एकूण १३ संस्थेविरूद्ध दरखास्ती दाखल करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित थकीत कर्जदार सहकारी संस्थेवर व संस्थेच्या संचालकांवर वसुलीची कार्यवाही करणेचे कामकाज युद्धपातळीवर चालू आहे. याद्वारे प्राप्त होणाऱ्या निधीतून जिल्हा परिषदेचा अडकलेला निधी टप्याटप्याने अदा करण्यात येणार आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदांचा जिल्हा मध्यवर्ती बँकेत अडकलेला निधी परत मिळण्याबाबत योग्यती कार्यवाही करण्याची विनंती करणारी पत्रे ग्राम विकास विभागाकडून सहकार विभागास पाठविण्यात आली आहेत. याबाबत वारंवार पाठपुरावा करून दिनांक ३ डिसेंबर, २०१४, दिनांक १९ जानेवारी, २०१५ व दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी अर्ध शासकीय पत्रे सहकार विभागास पाठविण्यात आली.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, बीड जिल्हा परिषदेने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये सहकारी बँकेत अडकलेले रुपये १७४ कोटी वसूल करण्यासाठी कोणती कार्यवाही केलेली आहे, जिल्हा परिषदेची एवढी मोठी रक्कम बँकेकडे ठेव स्वरुपात असताना बँकेकडून हमी का घेतली नाही, यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे सध्या १९५ कोटी रुपये शिल्लक आहेत. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, बँकेकडून हमी घेण्याची पद्धत नव्हती. आतापर्यंत बँक अस्तित्वात आहे. यावर मुख्य कार्यकार अधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाचे त्यावेळी असे निदेश होते की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम जमा करावी. अगोदरपासून निधी जिल्हा मध्यवर्ती बँकेत जमा असायचा. २०११ मध्ये ही अडचण आली.

तद्नंतर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, बँकेची आर्थिक स्थिती चांगली नाही, थकबाकी मोठी आहे. मागील ५-६ वर्षे दुष्काळाची परिस्थिती होती. त्यामुळे थकबाकी वसूल झालेली नाही. जी रक्कम वसूल झाली त्यातून त्यांनी मोठ्या प्रमाणात वैयक्तीक ठेवी परत केलेल्या आहेत. त्यांच्या संस्थात्मक ठेवी, अर्बन बँका, सहकारी संस्था आणि जिल्हा परिषदेच्या ठेवी होत्या. आतापर्यंत त्यांनी ३९५ कोटी रुपयांच्या वैयक्तीक ठेवी परत केल्या आहेत. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन विभागाने परिपत्रक निर्गमित केले होते. त्यानुसार सक्तीच्या वसुलीला स्थगिती दिली आहे. जोपर्यंत वसुली होत नाही तोपर्यंत ते रक्कम परत देऊ शकणार नाहीत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, वसुलीची जबाबदारी बँकेची आहे. शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेने बँकेमध्ये ठेव म्हणून रक्कम ठेवली होती, ती रक्कम वसूल करून देण्याची जबाबदारी सहकार विभागाची आहे. जिल्हा परिषदेने वसुलीसाठी हायकोर्टात धाव घेतली आहे. कारण त्यांना शासन मदत करण्यास तयार नाही. शासन म्हणून आपली

जबाबदारी आहे, त्यांची रक्कम वसूल करून दिली पाहिजे. हायकोर्टाचा निर्णय येईपर्यंत वाट पाहणे हे बरोबर नाही. तसेच बँकेला ठेव निधीतील ७५ टक्के निधी वापरता येतो, परंतु चालू खात्यातील निधी वापरता येत नाही. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, सहकार न्यायालयाचा निकाल आला तर सेक्शन १५६ खाली विशेष वसुली अधिकारी नेमता येतो. जिल्हा परिषदेने मा. उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. वसुली होईल त्यामधून शासन निधी परत करणार आहे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, संपूर्ण राज्यातील एका वर्षापूर्वीची आकडेवारी साधारणतः ६६० कोटी रुपये होती. नंदुरबार, नागपूर अशा वेगवेगळ्या जिल्हा परिषदांचे पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत होते. अमरावती जिल्हा परिषदेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून पैसे काढून ते स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा राष्ट्रीयकृत बँकेत ठेवावेत असे सांगितले. परंतु, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष किंवा इतर पदाधिकाऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून रक्कम काढून घेऊ नये. कारण बँकेतून पैसे काढून घेतले तर बँकेच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होईल असे सांगितले. आता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेचा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेऊ नये असा ग्रामविकास विभागाने निर्णय घेतलेला आहे. ॲक्टनुसार जिल्हा परिषदेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवता येतात.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतून राष्ट्रीयकृत बँकेत किंवा राष्ट्रीयकृत बँकेतून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवण्यासाठी वित्त समिती, स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावयास पाहिजे. एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पैसे ठेवण्याबाबत केवळ अधिकाऱ्यांनी निर्णय न घेता वित्त व सहकार विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा उप निबंधक यांनी बँकेची मागील ३ वर्षातील आर्थिक परिस्थिती तपासून त्या बँकेत पैसे ठेवावयाचे किंवा नाही याबाबत निर्णय घेऊन तो विषय जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवावयाचा आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेतल्याशिवाय पैसे काढण्याचे अधिकार नाहीत. जोपर्यंत सक्षम प्राधिकारी देयक संमत करीत नाही तोपर्यंत मुख्य लेखा व वित्त अधिकारी पैसे काढू शकत नाहीत.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदांचे पैसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकून राहतात. एका वर्षापूर्वी संपूर्ण राज्यातील ६६७ कोटी रुपये अडकून होते. ज्यावेळी बँकेत ठेवी ठेवता त्यावेळी हमी घेतली जाते काय असा प्रश्न विचारला होता. परंतु, सर्वांना असे वाटते की, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक टिकली पाहिजे, ग्रामीण भागातील बँका सक्षम झाल्या पाहिजेत. काही वेळा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवण्याबाबत दबाव आणला जातो. जिल्हा परिषदेने त्याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. राज्य शासन जिल्हा परिषदेला तो निर्णय फेटाळून लावण्यासाठी दबाब आणू शकत नाही.

यावर समितीने विचारणा केली की, वित्त विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकानुसार जिल्हा उप निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून त्यांनी ज्या बँकेत ठेवी ठेवलेल्या आहेत त्या बँकेची मागील ३ वर्षातील आर्थिक परिस्थिती कशी आहे, बँक नफ्यात आहे किंवा नाही हे बघावयाचे आहे. यावर प्रधान सचिव, सहकार विभाग यांनी खुलासा केला की, बँकांना करंट अकाऊंट मधील पैशातून कर्ज देता येत नाही. परंतु, ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी करंट अकाऊंट मधील पैसे वापरता येतात असा नियम आहे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सहकार विभाग आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक हे दोन्ही शासनाचे भाग आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुद्धा चांगल्या पद्धतीने चालली पाहिजे. परंतु, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चालविण्याबाबत जिल्हा परिषदेवर भार येऊ शकत नाही. जिल्हा परिषदेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवता येतील हे आपण मान्य करू शकतो. परंतु, जिल्हा परिषदेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पैसे ठेवले नाहीत तर ते का ठेवले नाहीत असे होता कामा नये.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवी ठेवताना लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंद मागवून घेतली पाहिजे. कारण, त्या बँकेवर शेकडो रुपयांचे कर्ज असेल तर ती बँक केव्हाही बुडीत निघू शकते. ग्रामविकास व वित्त विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकानुसार जिल्हा सहकारी बँकेचा मागील ३ वर्षातील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून त्या बँकेत ठेवी ठेवावयाच्या किंवा नाही याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत आणि ठेवीदारांच्या ठेवी सुद्धा सुरक्षित राहिल्या पाहिजेत.

यावर समितीने विचारणा केली की, १७४ कोटी रुपयांमध्ये शासन निधीमधील कोणत्या लेखाशीर्षामधील पैसे आहेत. १७४ कोटी रुपयांमध्ये शासन निधीची रक्कम १०९ कोटी रुपये आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेला वेळोवेळी २९ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. जिल्हा परिषदेने त्यापैकी अखर्चित राहिलेली रक्कम परत केलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी कायदेशीर नोटीस देण्यात आली होती व दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ रोजी त्यांनी उत्तर सादर केले होते. त्यामध्ये त्यांनी नमूद केले होते की, १-२ महिन्यामध्ये निधी किंवा कर्जमाफीची रक्कम प्राप्त होणार असून उक्त रक्कम प्राप्त झाल्यानंतर प्राधान्याने रक्कम येईल. उक्त कालावधीत त्यांच्याकडून कार्यवाही न झाल्याने याचिका दाखल केली असून ती दाखल होण्याच्या मार्गावर आहे.

यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेची १७४ कोटी रुपये रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अडकलेली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी हतबल झालेले आहेत. सदरहू रक्कम परत मिळत नसल्याची बाब विचारात घेऊन सदरहू प्रकरणी त्यांनी कार्यवाही केली आहे.

## अभिप्राय व शिफारशी

बीड जिल्हा परिषदेने स्वनिधीमधून नवीन महिंद्रा कंपनीच्या ५ बोलोरो गाड्या/वाहने खरेदीसाठी रुपये २९,३०,५००/- इतका खर्च सन २०१२-२०१३ मध्ये केलेला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी जिल्हा परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पंचायत समित्यांसाठी घसारा निधीतून वाहन खरेदीसाठी मान्यता देण्यात आली असताना नवीन वाहन खरेदी जिल्हा परिषद स्वनिधीमधून करण्यात आली. जुनी वाहने निर्लेखित न करता नवीन वाहने खरेदी केली. निर्लेखनास विभागीय आयुक्त यांची मान्यता असून निर्लेखन केले नाही. वाहने सुव्यवस्थित प्राप्त झालेबाबत विभाग प्रमुखांचे प्रमाणपत्र नाही तसेच अदायीची पावती घेतलेली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखा माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, ५ पंचायत समित्यांसाठी ५ गाड्या घेतलेल्या आहेत. अंबाजोगाई, पाटोदा, आष्टी या पंचायत समितीची वाहने जुनी झालेली होती. यामुळे सन १९९७ मध्ये ५ वाहने व सन २००२ मध्ये १ वाहन खरेदी करण्यात आले. आयुक्तांकडे याबाबतचा प्रस्ताव देण्यात आला होता. दिनांक २५ मार्च, २०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभेने वाहन खरेदीस मान्यता दिलेली होती, घसारा निधी १८ लाख ३९ हजार रुपये एवढी शिल्लक रक्कम कमी होती. जिल्हा परिषदेचा रुपये १७४ कोटी ८३ लाख १६ हजार एवढा निधी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत चालू खात्यामध्ये होता. सदर निधी जिल्हा परिषदेला न मिळाल्यामुळे घसारा निधीतून खर्च करता आला नाही. सदर प्रस्ताव आयुक्तांकडे दिला होता, आयुक्तांनी प्रस्तावास दिनाक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी परवानगी दिलेली होती. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या बजेटमध्ये सुधारित ३० लाख रुपये पंचायत समित्यांना वाहन खर्च या बाबीसाठी तरतुद करण्यात आली. तथापि, जिल्हा परिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये ठरावान्वये पंचायत समित्यासाठी घसारा निधीतून वाहन खरेदीसाठी मान्यता देण्यात आली असताना नवीन वाहन खरेदी जिल्हा परिषद स्वनिधीमधून करण्यात आली तसेच जुनी वाहने निर्लेखित न करता नवीन वाहने खरेदी केली. निर्लेखनास विभागीय आयुक्तांची मान्यता असूनही निर्लेखन केले नाही, असे दिसून येते. तसेच साक्षीदरम्यान तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला वाहन खरेदीच्या मान्यतेबाबत विसंगत उत्तरे दिली व समितीचा बहुमूल्य वेळ वाया गेला त्यामुळे समितीने तीव्र

नापसंती व्यक्त केली. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करून संबधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये बीड जिल्हा परिषदचा विभागनिहाय एकूण रुपये एकशे चौऱ्याहत्तर कोटी त्र्याऐंशी लक्ष सोळा हजार एवढा निधी अडकलेला आहे. सदर निधी शासनाच्या निर्देशानुसार बीड जिल्हा परिषदेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ठेव म्हणून ठेवलेला होता. त्यामुळे सदर निधीची रक्कम वसूल करून देण्याची जबाबदारी सहकार विभागाची आहे. जिल्हा परिषदेने वसुलीसाठी मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असली तरी शासन म्हणून रक्कम वसूल करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे सहकार विभागाने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून उपरोक्त रक्कम बीड जिल्हा परिषदेला प्राप्त करून देण्यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन माहिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, बीड
## कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश बनावट असल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.२०२ (सन २०१२-१३)**

शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, बीड च्या सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षणास काही कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश बनावट असल्याचे दिसून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :---

(१) शिक्षण विभागाचे पत्र जा.क्र.शिक्षण/जि.प.बीड/शि.पो./प्रा.पि.१अ १७८६/१२/१११६३, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ अन्वये श्रीमती शेख बुशरा बेगम मुनिर बेग, सहशिक्षिका यांना कारणे दाखवा नोटीस देऊन समुपदेशनाने दिलेल्या पदस्थापनेच्या कार्यवृत्तामध्ये समावेश नसून वादग्रस्त आदेशानुसार बदली झाल्याचे भासवून कार्यरत शाळेतून कार्यमुक्त झाले आहात त्या आदेशाची नोंद शिक्षण विभागाचे जावक नोंदवही मध्ये आढळून आली नसल्याने सदरचा आदेश बनावट असल्याचे सिद्ध होते.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ३६ नुसार फसवणूक प्रकरणाची माहिती स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागास कळविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :--**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते :---

(१) शिक्षण विभागाचे जा.क्र./शिक्षण/जि.प./शि.वि./प्रावि १ अ/१७६८/१२ ११६३ दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ अन्वये श्रीमती शेख बुशरा बेगम मुनीर बेग, सहशिक्षिका यांना बनावट आदेश प्रकरणी दोषी ठरवून त्यांची एक वार्षिक वेतन वाढ कायम स्वरुपी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशी बंद करण्यात आली आहे. सोबत सदर वेतनवाढ बंदची प्रत जोडण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ३६ नुसार लांडीलबाडी प्रकरणाची माहिती शिक्षण विभागाचे (प्राथमिक) पत्र क्र.जा.क्र.३६२२ दिनांक ८ डिसेंबर, २०१७ द्वारे सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण कार्यालय, बीड यांना कळविले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, शिक्षण विभाग जिल्हा परिषद, बीड येथील सन २०१२-२०१३ च्या लेखापरिक्षणात काही कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश बनावट असल्याचे दिसून आले. शिक्षण विभागाचे पत्र जा.क्र./शिक्षण/जि.प.बीड/शि.पो./प्रा.पि.१अ १७८६/१२/१११६३, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ अन्वये श्रीमती शेख बुशरा बेगम मुनिर बेग, सहशिक्षिका यांना कारणे दाखवा नोटीस देऊन समूपदेशनाने दिलेल्या पदस्थापनेच्या कार्यवृत्तामध्ये समावेश नसून वादग्रस्त आदेशानुसार बदली झाल्याचे भासवून कार्यरत शाळेतून कार्यमुक्त झाले आहात, त्या आदेशाची नोंद शिक्षण विभागाच्या जावक नोंदवहीमध्ये आढळून आली नसल्याने सदरचा आदेश बनावट असल्याचे सिद्ध होते. यासंदर्भात अशा प्रकारचे किती बनावट आदेश आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, असे एकूण १७ बनावट आदेश आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, बनावट आदेश तयार करणाऱ्या १७ कर्मचाऱ्यांवर केवळ पुढील वेतनावर परिणाम होईल अशा प्रकारची एका वर्षाकरिताची वेतनवाढ थांबविण्याची कमी शिक्षा का देण्यात आली, खोटे बदलीचे आदेश सादर करून सोयीच्या ठिकाणी रुजू होणाऱ्या शिक्षकांवर जरब बसेल अशी कारवाई न करता किंवा त्यांना सेवेतून बडतर्फ न करता सेवेत कायम ठेवलेले आहे. त्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग मिळालेला आहे, दर सहा महिन्यांनी महागाई भत्ता मिळत आहे. बनावट आदेश तयार करणारे एकूण १७ कर्मचारी आहेत व त्यांची केवळ एका वर्षाची वार्षिक वेतनवाढ रोखलेली आहे. हे भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० चे प्रकरण आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भातील समायोजनाचे इतिवृत्त झालेले होते. त्याशिवाय एकूण १७ लोकांनी समायोजनाच्या इतिवृत्तामध्ये समावेश नसताना त्यांच्या स्वतःच्या बोगस स्वाक्षऱ्या केल्या होत्या. ही बाब जिल्हा परिषदेच्या लक्षात आल्यावर त्यांची वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी नसून एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद केलेली आहे. ज्यांनी बोगस आदेश काढले होते, त्यांना तात्काळ त्यांच्या मूळ ठिकाणी पाठविले होते. त्या १७ शिक्षकांनी स्वतः आदेश तयार केले व त्यावर स्वतःची स्वाक्षरी केली आणि स्वतः मुक्त झाले व हव्या त्या ठिकाणी रुजू झाले.

यानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, भ्रष्टाचार लहान असो की, मोठा असो तो भ्रष्टाचारच आहे. परंतु हे तर बोगस स्वाक्षऱ्यांचे अतिशय गंभीर प्रकरण आहे. बनावट आदेश तयार करणारे शिक्षक आता सेवेत असतील तर त्यांच्यावर ४२० चा गुन्हा दाखल करण्यात यावा. या प्रकरणामध्ये सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

पुढे समितीने विचारणा केली की, शिक्षकांनी स्वतःच्या बदलीचे आदेश स्वतः कसे काढले, त्याकरिता यंत्रणा आहे की, नाही, स्वतःचा आदेश स्वतःला कसा काढता येईल, आदेशावर कोणत्या अधिकाऱ्याने स्वाक्षरी केली होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, शिक्षण अधिकाऱ्याऐवजी संबंधित शिक्षकांनीच त्यांचे बदली आदेश तयार केले व स्वतःच्या बदली आदेशावर स्वतःच बोगस सह्या केलेल्या आहेत.

या उत्तरानंतर समितीने असे मत व्यक्त केले की, त्याकरिता जिल्हा परिषदेची यंत्रणा कार्यरत आहे. विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, गट शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी ही यंत्रणा कार्यरत आहे. ही सर्व प्रक्रिया असताना असे कसे होऊ शकेल, शिक्षकांनीच त्यांचे बदली आदेश तयार केले व बदलीचे आदेश काढले आणि रुजू झाले, असे होत नाही आणि असे झाले असेल तर यामध्ये काही अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही सहभाग असेल. हे काम अधिकाऱ्यांच्या सहभागाशिवाय होऊच शकत नाही. ही बाब अधिकाऱ्यांच्या लक्षात आली नाही काय, यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ही बाब अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावरच सदरहू आदेश रद्द करण्यात आले आणि त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली. तत्कालिन शिक्षणाधिकारी श्री. एस.आर. सानप हे होते. त्यांना आजच्या बैठकीला बोलविले होते, परंतु ते आले नाहीत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, या प्रकरणामध्ये केवळ शिक्षकांनाच लक्ष्य करण्यापेक्षा यातील दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. शिक्षकांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखल्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. परंतु या प्रकरणात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. दोषी १७ शिक्षकांवर फौजदारी गुन्हे दाखल झालेच पाहिजे. या १७ शिक्षकांनी स्वतःच बदली आदेश तयार करून त्यावर स्वतःच स्वाक्षरी केलेली आहे. ही तर भ्रष्टाचाराची परिसीमा झालेली आहे. संबंधितांवर कठोर कार्यवाही न झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी हे देखील अशा प्रकारे बोगस आदेश काढतील, हे अतिशय मोठे व गंभीर प्रकरण आहे. त्या शिक्षकांच्या चुकीवर पांघरुण घालण्याचे काम व्हायला नको. त्या शिक्षकांवर गुन्हे दाखल झाले पाहिजे. ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लक्षात आल्यावर त्या शिक्षकांना तातडीने निलंबित का केले नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीचे म्हणणे योग्य आहे. त्या शिक्षकांना तेव्हाच निलंबित करायला पाहिजे होते.

सदरहू १७ शिक्षक बीड जिल्ह्यातील होते. परंतु तत्कालीन अधिकाऱ्यांनी तसे केले नाही. दोषी शिक्षकांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद केलेली आहे. तसेच या प्रकरणातील वरिष्ठ लिपीकाने ही बाब शिक्षणाधिकारी यांच्या निदर्शनास आणून न दिल्यामुळे त्याची देखील एक वेतनवाढ रद्द केलेली आहे. एका शिक्षकाने बनावट आदेश तयार करून त्यावर बोगस स्वाक्षरी केल्याची बाब दुसऱ्या शिक्षकाच्या लक्षात आली व त्यानेही तसे केले. ही बाब लक्षात आल्यावर चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये १७ शिक्षकांनी बोगस सह्या केल्याचे आढळून आले. त्यामुळेच यातील दोषी असलेले १७ शिक्षक आणि १ लिपिक यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविलेली आहे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, केवळ लिपिकाच्या अधिकारात असे होत नाही. हे प्रकरण शिक्षक आणि अधिकारी यांच्या स्तरावरील आहे. ही बाब सर्वांच्या संगनमताने झालेली आहे. यामध्ये फार मोठा गोंधळ झालेला आहे. हे सोपे प्रकरण नसून राज्यातील अद्वितीय आणि अविस्मरणीय असे उदाहरण आहे.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी आयुक्त कार्यालय आहे. हा घोटाळा झाल्यानंतर ही बाब आयुक्तांच्या निदर्शनास केव्हा आली, आयुक्त कार्यालयाने त्यांची भूमिका पार पाडलेली आहे काय, आयुक्त कार्यालयाने या प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केलेली आहे, यावर सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी विदित केले की, लेखा आक्षेप आयुक्त कार्यालयाकडे सादर होतात. या अनुषंगाने आयुक्त कार्यालयाकडे काही कळविण्यात आलेले नाही. यासंदर्भात सविस्तर माहिती दुपारच्या सत्रामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. कृपया तोपर्यंत वेळ देण्यात यावा, अशी समितीला विनंती आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे लेखा आक्षेप सादर होतात. परंतु आयुक्त कार्यालयाने ही माहिती वाचलेलीच नाही. जिल्हा परिषदेची सखोल चौकशी करण्याचे काम आयुक्त कार्यालयाचे आहे. आक्षेप आल्यानंतर हे प्रकरण पाच वर्षांपासून प्रलंबित राहिले. या काळात आयुक्त कार्यालयाने कार्यवाही करणे आवश्यक होते. या काळात आयुक्त कार्यालयाने कोणती कार्यवाही केली, बैठकीसाठी आयुक्तांना बोलविण्यात यावे. यावर सहाय्यक आयुक्तांनी खुलासा केला की, यासंदर्भातील सविस्तर माहिती आज दुपारपर्यंत सादर करण्यात येईल.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरण सन २०१२-१३ मधील असून उक्त बाब त्याच वेळी निदर्शनास आली होती व संबंधिताची वेतनवाढ दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी थांबविण्यात आली आहे. सदरहू प्रकरणाची कार्यवाही लेखापरिक्षण यांना कळविण्यात आली आहे. उक्त प्रकरणे पूर्वी निदर्शनास आली असून त्यासंदर्भात पोलिसांकडे गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. बनावट भरतीचे प्रकरण सन २०१० मधील आहे.

यावरुन समितीच्या असे निदर्शनास आले की, सदरहू प्रकरण अतिशय गंभीर आहे. त्याबाबत समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. अनेक कर्मचारी यांनी स्वतःच स्वतःच्या बदलीचा आदेश काढून बदलीच्या ठिकाणी रुजू झाले आहेत. उक्त गंभीर प्रकरणी अशा कर्मचाऱ्यांची केवळ एक वेतनवाढ कायम स्वरुपी थांबविण्याची किरकोळ शिक्षा देण्यात आली आहे. सदरहू प्रकरणी भारतीय दंड संहितेमधील तरतूदीनुसार गुन्हा नोंदविण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली नाही. उक्त बनावट बदली आदेश केंद्र प्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, शिक्षण अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणे गरजेचे होते. सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करावी व दोषींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून त्याबाबतचा अहवाल तात्काळ समितीस सादर करण्यात यावा. अशाच प्रकारची प्रकरणे राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये घडली असण्याची शक्यता असल्याने उक्त विषयाप्रकरणी विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने पुढील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बीड जिल्हा परिषदेमध्ये सन २०१० मध्ये झालेल्या शिक्षकांच्या बदल्यांच्या बनावट आदेशाप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशी नुसार दोषी आढळून आलेल्या संबंधीताविरूद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून पुढे कोणती कार्यवाही केली आहे तसेच अशाच प्रकारे किती प्रकरणे राज्यातील इतर जिल्ह्यामध्ये घडली आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये परिच्छेद क्र. ०३.२०२ मध्ये नमूद केल्यानुसार बीड जिल्ह्यामध्ये सन २०१० मध्ये शिक्षकांच्य बनावट आदेशा प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागविण्यात आलेली आहे.

त्यानुसार सादर करण्यात येते की, सन २०१२ मध्ये शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीडच्य आस्थापनेवरील शिक्षकांच्या दिर्घवास्तव्य / विनंतीवरून करावयाच्या बदल्यासाठी यादी प्रसिद्ध करून समुपदेशाने बदली प्रक्रीया पार पाडण्यात आलेली आहे. सदरील दिर्घवास्तव्याच्या /विनंती बदल्याच्या याद्यामध्ये समुपदेशासाठी ठेवलेल्या उपस्थितीपटामध्ये किंवा समुपदेशनाने दिलेल्या पदस्थापनेच्या यादीमध्ये समावेश नसलेल्या तसेच समुपदेशनाने दिलेल्या पदस्थापनेबाबतच्या कार्यवृत्तामध्योही ज्या शिक्षकाचा समावेश होवून बनावट आदेशामध्ये नमूद शाळेवर रुजू झालेल्या शिक्षकांबाबत माहिती मागविण्यात आलेली होती. सदरील बनावट आदेशाची नोंद शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड विभागाचे जावक नोंदवहीमध्ये आढळून आलेले नसल्याने सदर आदेश बनावट आहेत हे सिद्ध झालेले आहेत. त्यानुसार संबंधित खालीलप्रमाणे १७ शिक्षकांना

(१) श्रीम. माने केशरबाई बापु. स.शि.प्रा.शा.मिरवट, ता.परळी

(२) श्री. जाधव रामराव परशुराम, स.शि.प्रा.शा.मिरवट, ता.परळी

(३) श्री. कुलकर्णी दिलीप लक्ष्मणराव, स.शि.प्रा.शा. रेल्वेस्टेशन, ता. परळी

(४) श्री. ससाणे अर्जुन उमाजी, स.शि.प्रा.शा.सुशीवडगाव, ता. गेवराई

(५) श्री. कांदे रमेश अर्जुन उमाजी, स.शि.प्रा.शा. पट्टीवडगांव, ता. अंबाजोगाई

(६) श्री. माले सुनिल वसंतराव, स.शि.प्रा.शा.मालेवाडी तांडा, ता. अंबाजोगाई

(७) श्री. शेख खलील अहमद अ.रशीद, स.शि.प्रा.शा. पिंपळा धायगुडा, ता. परळी

(८) श्री. सिद्दीकी बुशेरा इमामोद्यीन, स.शि.प्रा.शा. शेपवाडी, ता. अंबाजोगाई

(९) श्री. भोसले विकास प्रभाकर, स.शि.प्रा.शा. लाडझरी, ता. परळी

(१०) श्री. मराडे शेषराव दिनकर, स.शि.प्रा.शा. कन्यारवाडी, ता.बीड

(११) श्री. वाघमारे सुधारक लाला, स.शि.प्रा.शा. ममदापुर, ता.पाटोदा

(१२) श्रीम. केंद्रे सारिका मन्मथ, स.शि.प्रा.शा.लाडझरी, ता.परळी

(१३) श्रीम. गिराम मिराबाई मोहनराव, स.शि.प्रा.शा.काळवंटी तांडा, ता.परळी

(१४) श्री. होळंबे नानासाहेब महादेव, स.शि.प्रा.शा.घाटनांदूर, ता.अंबाजोगाई

(१५) श्री. सरवदे सुधाकर गुरूलींग, स.शि.प्रा.शा. रेल्वेस्टेशन, ता.परळी

(१६) श्रीम. जोगदंड मालंदा मधुकर, स.शि.प्रा.शा.घाटनांदूर, ता.अंबाजोगाई

(१७) श्रीम. शेख बुशरा बेगम मुनीर बेग, स.शि.प्रा.शा.केज, ता.केज.

दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ च्या कारणे दाखवा नोटीसद्वारे खुलासा मागविण्यात आला होता. त्यानुसार संबंधिताने सादर केलेला खुलासा अमान्य करून संबंधिताची बनावट आदेशद्वारे झालेली बदली रद्द करून संबंधिताची दिनांक

१० जानेवारी, २०१३ च्या आदेशाद्वारे एक वार्षिक वेतनवाढ कायमची बंद करण्याबाबत शस्ती देण्यात आलेली आहे. व शास्तीची नोंद संबंधिताच्या सेवापुस्तीकेत घेण्यात आलेली आहे.

तसेच सदर बनावट बदली आदेशबाबत अनियमितता करणाऱ्या शिक्षण विभागातील कनिष्ठ सहायक, श्री. जाहेदउल्ला एस. एम. यांना निलंबीत करून विशेष चौकशी आदेशीत करण्यता आलेली होती. सदरील विशेष चौकशीच्या अहवालामध्ये संबंधीताविरूद्ध आरोप सिद्ध झाल्यामुळे संबंधीतास दिनांक १० जुलै, २०१४ च्या आदेशान्वये एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्यात आलेली आहे.

तरी परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे बनावट बदली आदेशासंदर्भात चौकशी करून जिल्हा परिषद, बीड ने दोषी विरूद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील तरतुदीनुसार कार्यवाही केलेली आहे.

करिता अनुपालन स्विकृत व्हावे ही विनंती.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-१४) जिल्हा परिषद, बीड यांच्या स्तरावरून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे अभिप्राय :-** सदर मुद्दा हा ग्रामविकास विभागाशी संबंधित दिसून येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, बीड जिल्ह्यामध्ये बनावट बदलीच्या अनेक घटना घडलेल्या आहेत, याबाबत खुलासा करावा.

यावर ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, सदरहू बनावट आदेश बदली प्रकरणी संबंधितांवर सन २०१३-१४ मध्ये एक वेतनवाढ रोखणे व इतर कारवाई करण्यात आली आहे. आता अशा पद्धतीने बदली आदेश तयार करणे शक्य नाही. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणे सन २०१० मध्ये उद्भवलेली आहेत. आता अशी प्रकरणे उद्भवत नाहीत व उद्भवू शकणार नाहीत. सदरहू प्रकरणी पूर्णपणे काळजी घेण्यात येत आहे. सदरहू प्रकरणे बनावट बदली आदेशांची होती, बनावट नियुक्ती आदेशांची नव्हती.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद बीड, शिक्षण विभागाच्या सन २०१२-२०१३ च्या लेखापरिक्षणामध्ये काही कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश बनावट असल्याचे दिसून आले याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. जिल्हा परिषद, बीड शिक्षण विभागाच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या पत्रानुसार सहशिक्षिका श्रीमती शेख बुशरा बेगम मुनिरबेग यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. वादग्रस्त आदेशानुसार बदली झाल्याचे भासवून कार्यरत शाळेतून कार्यमुक्त झाल्याच्या आदेशाची नोंद शिक्षण विभागाच्या जावक नोंदवहीमध्ये आढळली नसल्याने सदरचा आदेश बनावट असल्याचे सिद्ध होते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पचांयत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ३६ नुसार सदर फसवणुकी प्रकरणी स्थानिक निधी लेखा परिक्षा विभागास कळविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, शिक्षण विभाग जिल्हा परिषद, बीड येथील सन २०१३-२०१३ च्या लेखा परिक्षणात काही कर्मचाऱ्यांचे बदलीचे आदेश बनावट असल्याचे दिसून आले. शिक्षण विभागाचे पत्र जा.क / शिक्षण / जि.प.बीड / शि.पो/ प्रा. पि. १अ १७८६/१२/१११६३, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ अन्वये श्रीमती शेख बुशरा बेगम मुनिर

बेग, सहशिक्षिका यांना कारणे दाखवा नोटीस देऊन समुपदेशाने दिलेल्या पदस्थापनेच्या कार्यवृत्तामध्ये समावेश नसून वादग्रस्त आदेशानुसार बदली झाल्याचे भासवून कार्यरत शाळेतून कार्यमुक्त झाल्या आहेत. त्या आदेशाची नोंद शिक्षण विभागाच्या जावक नोंदवहीमध्ये आढळून आली नसल्याचे सदरचा आदेश बनावट असल्याचे सिद्ध होते असे एकूण १७ बनावट आदेश आहेत. सदर १७ बनावट आदेश तयार करण्याऱ्या १७ कर्मचाऱ्यांवर केवळ पुढील प्रमाणे होईल अशाप्रकारची एका वर्षाकरिताची वेतनवाढ थांबविण्याची कमी शिक्षा देण्यात आली आहे. बनावट बदलीचे आदेश सादर करून सोयीच्या ठिकाणी रूजू होण्याऱ्या शिक्षकांवर जरब बसेल अशी कारवाई न करता किंवा त्यांना सेवेतून बडतर्फ न करता सेवेत कायम ठेवलेले आहे.

सदर १७ कर्मचाऱ्यांनी समायोजनाच्या इतिवृत्तामध्ये समावेश नसताना त्यांच्या स्वतःच्या बोगस साक्षऱ्या केल्या होत्या ही बाब जिल्हा परिषेदेच्या निदर्शनास आल्यावर संबंधितांची वार्षिक वेतनवाढ एका वर्षासाठी नसून एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी बंद केलेली आहे. बोगस स्वाक्षऱ्यांचे हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. शिक्षण अधिकाऱ्याऐवजी संबंधित शिक्षकांनीच त्यांचे स्वतःचे बदलीचे आदेश काढले व त्यावर स्वतःच बोगस सह्या केलेल्या आहेत, त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

समितीच्या मते संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भात जिल्हा परिषदेची यंत्रणा कार्यरत आहे. विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी या यंत्रणेमार्फत सर्व प्रक्रिया होणे अभिप्रेत असताना संबंधित शिक्षकांनीच त्यांचे स्वतःचे बदलीचे आदेश काढणे आणि बदलीच्या ठिकाणी रूजू होणे ही बाब अत्यंत गंभीर व अनाकलनीय आहे. तत्कालिन शिक्षणाधिकारी यांना समितीच्या बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले होते. तथापि, ते बैठकीसाठी अनुपस्थित राहिले त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**शिक्षकांच्या बदलीच्या बनावट आदेशप्रकरणी भारतीय दंड संहितेमधील तरतुदीनुसार गुन्हा नोंदविण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली नाही. उपरोक्त बनावट बदलीचे आदेश केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासणे गरजेचे होते, त्यामुळे प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करावी व चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांविरूद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात पुन्हा अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही तसेच ज्या शिक्षकांनी बनावट बदल्यांचे आदेश तयार करून बदल्या करून शासनास फसविले आहे अशा शिक्षकांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल न करता त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्या एक-एक वेतनवाढी रोखल्या. मात्र सदर बाब गंभीर असून त्यांचेविरुद्ध फौजदारी कारवाई करणे आवश्यक आहे व तसे न करता त्यांचेविरुद्ध केवळ प्रशासकीय कारवाई करून जिल्हा परिषदेच्या संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली या आरोपासह त्यांचीही चौकशी करून त्यांचेवर जबाबदारी निश्चित करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला १ महिन्याच्या आत  पाठविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, बीड

## राष्ट्रीय पेयजल व महाजल योजना अंतर्गत कामातील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.५७३ (सन २०१२-१३)**

राष्ट्रीय पेयजल व महाजल योजना ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबविताना कामात झालेल्या अनियमितता व शासनाच्या नियमानुसार कपात न केलेल्या रकमांबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :---

(१) देयकातून आयकराची २.२४ टक्के दराने रक्कम रुपये ३६,७१,१३९/- वसुल केलेली नाही. नोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातुन २% व्हॅटची रक्कम कपात करणे व अनोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातुन ४ टक्के ऐवजी ५% व्हॅटची रक्कम रुपये ८१,७०,१६२/- वसूल केलेली नाही. कामगार विमा १ टक्के रक्कम रुपये १७,७०,१०१ वसूल करून भरणा व १% बांधकाम उपकर रक्कम रुपये १७,७०,१०१/- वसूल करणे आवश्यक आहे.

(२) पाणीपुरवठा योजनेची आखणी करताना दरडोई ४० लिटर पाणी याप्रमाणे पाणीपुरवठ्याचे प्रमाण विचारात घेऊन कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु तहसील कार्यालयाने जनगणनेचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. योजनेचे अंदाजपत्रक जनगणनेप्रमाणे करणे आवश्यक आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम १७४ मधील नमुन्यात देयके तयार करून पारित करणे आवश्यक असताना ती नमुना २९ मध्ये आकस्मिक खर्चाच्या देयकावर तयार करून पारित केलेली आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :--**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

(१) आयकराची २.२४% दराने रक्कम रुपये ३६,७१,१३९/- या रक्कमा बाबत विक्रीकर आयुक्त, औरंगाबाद यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड यांना आदेशित केलेल्या आदेश क्र. दिनांक २४ सप्टेंबर, २००३ प्रमाणे आयकर कपात केला नाही.

(२) सदरील योजनेची कामे ही ग्राम पंचायतीने नेमुन दिलेल्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यामार्फत नळ पाणी पुरवठा योजनेची कामे करण्यात येत असल्याने त्या अनुषंगाने अपर विक्रीकर आयुक्त, नागपुर क्षेत्र नागपुर यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना दिलेल्या मार्गदर्शनपर पत्रकात पत्र क्र.अविआ/नाक्षे/डी/१७/संकिर्ण/नागपूर, दिनांक ४/६११३ वर नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीने गाव पातळीवर ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना करून समितीकडून काम करून घेत आहे. त्या कामाकरिता लागणारे साहित्य ग्राम पंचायत स्वतः खरेदी करून व मंजुरी स्वतः मजुरांना प्रदान करीत असेल तर अशा प्रकारच्या विकास कामावर विक्रीकर व्हॅट देय होत नाही. सदरील पत्रकाची छायाप्रत सोबत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

(३) कामगार विमा रक्कम रुपये १७,७०,१०१/- पैकी रुपये ११,८५,३८७/- तसेच कामगार कल्याण निधी रक्कम रुपये १७,७०,१०१/- पैकी रुपये ११,७६,८८७/- (६६.४८%) रक्कमेची वसुली संबंधित योजनेच्या उर्वरित पुढील हप्त्यामधून करण्यात आलेली आहे. सोबत कपात केलेल्या योजनांची माहिती तालुकानिहाय सादर करण्यात आली आहे. तसेच उर्वरित थकीत वसुली योजनेच्या अंतिम देयकातून शासन खाती भरणा करण्यात येत आहे.

(१) पाणी पुरवठा योजनांची आखणी करताना दरडोई दरदिवशी ४० लिटर या प्रमाणे पाणी पुरवठ्याचे प्रमाण विचारात घेऊन योजनेच्या कामाच्या अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे. योजना तयार करताना जनगणना पुस्तिका (Census Book) प्रमाणे लोकसंख्या विचारात घेण्यात आली आहे. ज्या गाव/वाड्या यांची लोकसंख्या जनगणना पुस्तकात उपलब्ध नाही त्या ठिकाणी गटविकास अधिकारी यांचेकडून प्राप्त लोकसंख्या विचारात घेण्यात येते.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम १७४ च्या नमुन्यामध्ये देयके तयार करून पारीत करण्याची दक्षता घेतली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अपूर्ण ५० कामांपैकी किती कामे पूर्ण झाली आहेत, विहित मुदतीत कामे पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत तसेच अद्याप अंतिम देयके अदा करण्याची किती देयके प्रलंबित आहेत, देयकांची अदाई करतांना शासन कपातीच्या रकमा का कपात करण्यात आल्या नाहीत, आक्षेपातील कपात रकमेपैकी वसूल रक्कम ६८ टक्के केव्हा करण्यात आली आहे, उर्वरित रक्कम वसुलीबाबत काय कार्यवाही केली तसेच अनुपालन अहवालातील पृष्ठ क्रमांक ४१ मध्ये सुरूवातीला असे दिलेले आहे की, विक्रीकर आयुक्त, औरंगाबाद यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड यांना आदेशीत केलेल्या आदेश क्र....दिनांक २४ सप्टेंबर, २००३ प्रमाणे आयकर कपात केली नाही, सदरहू ५० कामांचे काय झाले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, एकूण ५० कामे आहेत. ३२ कामे दुरुस्तीची होती, त्यामध्ये १८ विहिरी होत्या. लेखी आक्षेपामध्ये दाखविण्यात आलेली ५६ कामे पूर्ण झालेली आहेत. आक्षेपामध्ये जागेचे अभिलेखे नाही. आक्षेपामध्ये तपासणी अहवाल वाचले नाही, अशा पद्धतीचे आक्षेप आहेत. त्या आक्षेपांच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने त्याची पुर्तता केलेली आहे. सदरहू कामे पूर्ण झालेली आहेत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विचारणा केली की, सदरहू कामे मुदतीत पूर्ण झालेली आहे काय, मुदतीत कामे पूर्ण झाली नसतील तर संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा) यांनी विदित केले की, सदरहू कामे समित्या करीत असल्यामुळे अजूनपर्यंत दंडात्मक कार्यवाही केलेली नाही.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, काम पूर्ण झाल्यावर त्या गावामध्ये पाणी पोहोचले आहे किंवा कसे, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. ही योजना किती गावांनी हस्तांतरीत करून घेतलेली आहे, हस्तांतरीत झाली असेल तर त्या गावांना पाणी मिळत आहे काय, किती गावांना पाणी मिळते, योजना हस्तांतरीत झाली नसेल तर त्यामध्ये घोटाळा झालेला आहे काय, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा) यांनी विदीत केले की, यासंदर्भात माहिती उपलब्ध करून समितीला सादर करण्यात येईल. परंतु माझ्या माहितीप्रमाणे सर्व गावांमध्ये पाणी पोहोचलेले आहे.

समितीने असे मत व्यक्त केले की, आतापर्यंत अनेक वेळा सूचना करण्यात आलेल्या आहेत. या प्रश्नावलीतील पोट कलमाची माहिती देऊन सूचना करण्यात आल्या होत्या. असे असताना प्रश्नावलीमध्ये असलेल्या प्रश्नांची इत्यंभूत माहिती न ठेवणे व आज समितीपुढे उत्तरे न देणे, तसेच सदरहू माहिती तात्काळ सादर न करण्याचे काम अधिकाऱ्यांनी केलेले आहे. ही अतिशय गंभीर व हलगर्जीपणा करणारी बाब आहे. बीड जिल्ह्याची प्रगती होऊन शासन गतिमान झाले पाहिजे, असे समितीला वाटते. परंतु प्रश्नावली दोन महिन्यांपूर्वी पाठविण्यात आलेली असताना त्या प्रश्नांची उत्तरेही जिल्हा परिषद देऊ शकत नाहीत. पिण्याच्या पाण्याच्या ५६ योजना आहे, योजनांची पाहणी करणे, स्थळावर भेट देणे ही कामे आपण पूर्ण केलेली नाहीत. विविध कामांची इत्यंभूत माहिती न ठेवणे, समितीचा वेळ वाया घालविणे, समितीची दिशाभूल करणे ही कामे करीत आहात. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कारवाईसाठी पात्र आहेत, असे समितीचे मत तयार

झालेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी घेतली पाहिजे. समितीला योग्य ती माहिती न देणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी. ज्या विभागांच्या अधिकाऱ्यांनी समितीला योग्य व सविस्तर माहिती दिलेली नाही, त्यांची चौकशी करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा.

सर्व सन्माननीय समिती सदस्यांच्या भावना लक्षात घेता बीड जिल्ह्यामध्ये पाण्याची नेहमीच टंचाई असते. हा दुष्काळी जिल्हा आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या जिल्ह्यामध्ये दरवर्षी पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते व नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या शोधात फिरावे लागते. पिण्याच्या पाण्याअभावी जनावरांचे देखील मोठ्या प्रमाणात हाल होतात. पिण्याच्या पाण्याच्या ५६ योजना व इतर अनेक योजना प्रलंबित आहेत. ज्या योजना पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. सदरहू भेटीमध्ये योजनांची पाहाणी करण्यात येईल, विहिरींची पाहाणी करण्यात येईल व योजनेचा लाभ देण्यात आलेल्या गावांची पाहाणी करण्यात येईल. या योजनांसंदर्भातील सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात यावी. तसेच यासंदर्भात सविस्तर चौकशी करण्यात यावी व दोषींवर कारवाई करून समितीला दोन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बीड जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या-५६ योजना व इतर अनेक योजना प्रलंबित आहेत. या संदर्भात सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार दोषी आढळून आलेल्या संबंधिताविरुद्ध कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

केंद्र सरकारच्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार ग्रामपंचायत स्तरावरील ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत लोकसहभागावर आधारित व ग्राम पंचायतीच्या मागणीनुसार नळ पाणीपुरवठा योजना कार्यक्रम राबविण्यात आला होता. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय दिनांक २ मे २००५ नुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामाची अंमलबजावणी करावयाची होती. शासनाच्या महाजल व राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमामध्ये आक्षेपात नमूद असलेल्या ५० नळ पाणी पुरवठा योजना रखडलेल्या होत्या. तथापि, अभिप्रायामध्ये ५६ नमूद झालेले आहे.

रखडलेल्या ५० योजनांपैकी ३४ योजना अंतिम करून पाणी पुरवठा सुरू झालेला आहे व १६ योजना अद्यापही प्रगतीपथावर आहेत. योजना रखडण्याची सर्वसाधारण कारणांची चौकशी केली असता जिल्हा स्तरावरून पाणीपुरवठा व स्वच्छता समितीस वितरीत केलेल्या निधीचा समितीकडून अपहार झाल्याने ०३ योजनांच्या समितीच्या अध्यक्ष/सचिव यांचे विरोधात F.I.R दाखल करण्यात आला व सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

तसेच ०४ योजनांबाबत संबधित अध्यक्ष/सचिव यांच्या वैयक्तिक मालमत्तेवर बोजा (RRC) चढविण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्र. ग्रापापुवि/जिपबी/लेखा-१/३२५/९४९/दिनांक २६ मे, २०१७ अन्वये जिल्हाधिकारी बीड यांना ७/१२ वर बोजा टाकण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला व तद्नंतर जिल्हाधिकारी बीड यांच्याकडून त्यांच्या अधिनस्त असलेल्या तहसीलदार यांना दिनांक ३१ मे, २०१७ पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत. सदर ४ योजना अपूर्ण आहेत. सदर ४ योजनांची अपूर्ण कामे खात्यामार्फत पूर्ण करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

उर्वरित रखडलेल्या ४३ योजनापैकी ३३ योजना पूर्ण करण्यात आल्या असून त्या योजनांद्वारे पाणीपुरवठा सुरळीत सुरू आहे. ४३ पैकी सदर ३३ पूर्ण योजना वजा जाता शिल्लक १० योजनांपैकी ३ योजना कार्यान्वित झाल्या आहेत व ७ योजना खात्यामार्फत पूर्ण करण्याची नियोजन आहे.

करीता खालीलप्रमाणे ५० नळ पाणी पुरवठा योजनांची सद्यःस्थिती आहे.

**गोषवारा**

| विवरण | रखडलेल्या योजनांची संख्या | काम पूर्ण | अपूर्ण योजना | |
|---|---|---|---|---|
| | | | पाणीपुरवठा सुरू | पाणीपुरवठा बंद |
| एफ.आय.आर. | ३ | १ | १ | १ |
| आर.आर.सी. | ४ | ० | ० | ४ |
| इतर योजना | ४३ | ३३ | ३ | ७ |
| एकूण | ५० | ३४ | ४ | १२ |

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, बीडमार्फत कार्यवाही सुरू आहे. ग्राम पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य समितीचे नळ योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार दिनांक ९ मार्च २०१८ च्या शासन निर्णयान्वये काढून घेतले आहेत. FIR/अपहाराची वसुलीचा पाठपुरावा सुरू आहे. सर्व अर्धवट कामे पूर्ण होण्यासाठी सतत पाठपुरावा सुरू आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा की, बीड जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या ५६ योजना व इतर अनेक योजना प्रलंबित आहेत. त्यासंदर्भात सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय, यावर मु.अ. व वि.का.अ. यांनी खुलासा केला की, सदरहू योजनांची संख्या ५६ नसून यादीनुसार ५० इतकी आहे. त्यापैकी ३४ योजनांचे काम पूर्ण झाल्याचे चौकशीअंती दिसून आले आहे. सदरहू कामे केव्हा पूर्ण केली याबाबत निश्चित माहिती नाही.

तद्‌नंतर समितीच्या निदर्शनास आले की, बीड जिल्ह्यातील सर्व योजनांची कामे प्रलंबित असताना कामांची देयके अदा करण्यात आली आहेत. यावर मु.अ. व वि.का.अ. यांनी खुलासा केला की, सदरहू विषयीच्या ३ प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल करण्यात आला आहे. ४ प्रकरणांमध्ये पैसे वसूल करण्याकरिता नियमित वसूली प्रमाणपत्रे जारी केली आहेत. उर्वरित शिल्लक १२ कामांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून काम पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण पाणीपुरवठा समित्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, कायद्यामध्ये तरतूद आहे की, कामाचे मोजमाप संबंधित यंत्रणेकडून करून प्रमाणित केल्याशिवाय बँकेने रक्कम देऊ नये. सदरहू अट करारामध्ये समाविष्ट करण्यात येते. जिल्हा परिषदेच्या तांत्रिक पॅनलने प्रमाणित केल्यानंतर बँकेने संबंधितास रक्कम दिली. याचा अर्थ ग्रामीण पाणी पुरवठा समित्यांनी परस्पर पैसे काढलेले नाहीत. कामाच्या मोजमापाच्या आधारे ग्रामीण पाणीपुरवठा समित्यांनी बँकेतून पैसे काढले आहेत. पाणी पुरवठा समितीवर एफआयआर दाखल करताना पाणी पुरवठा विभागाच्या तांत्रिक विभागातील संबंधितांवरही एफआयआर दाखल का करण्यात आला नाही.

यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी खुलासा केला की, कामाचे मोजमाप झाल्यानंतर गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने कामाचे पैसे अदा करण्यात येतात. यावर समितीने विचारणा केली की, प्रमाणित केल्यानंतर

बँकेकडून संबंधितास रक्कम प्रदान करण्यात येते. मोजमाप करून काम झाल्याचे प्रमाणित केले आहे. उक्त कामांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदरहू काम झाल्याचे प्रमाणित कले आहे.

यावर मु.अ. व वि.का.अ. यांनी खुलासा केला की, सदरहू बाब सन २००९ पूर्वी झालेली आहे. सन २००९ पूर्वी टीएसपी यंत्रणा कार्यान्वीत होती. टीएसपी यंत्रणेवर एफआयआर दाखल केले नाहीत. यावर समितीने विचारणा केली की, टीएसपी यंत्रणेवर एफआयआर का दाखल केले नाही, खाजगी निमशासकीय व्यक्तिवर कारवाई करण्यात येते परंतु पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत नाही. तांत्रिक नियंत्रण पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे असल्याने त्यांना या प्रकरणातून का वगळण्यात आले आहे, उक्त प्रकरणी पाणी पुरवठा विभागातील किती अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यात आली आहे.

यावर मु.अ. व वि.का.अ. यांनी खुलासा केला की, आरआरसी ४ ठिकाणी करण्याची आवश्यकता भासलेली आहे. टीएसपी यंत्रणेवरही कारवाई केली पाहिजे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, सदरहू प्रकरणे ताबडतोब तपासून संबंधितावर कारवाई करावी. ५० पैकी ३४ योजना पूर्ण झाल्या आहेत, असा अहवाल समितीस सादर करण्यात आला आहे. अनेक गावांमध्ये करावयाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकामध्ये पाईपलाईन व पाण्याची टाकी यांचा समावेश करण्यात आला होता. पाणी पुरवठा करण्यासाठीची पाणी टाकी तयार केली नाही किंवा ती गळती झाल्यानंतरही पाणी पुरवठा सुरू केला व योजना पूर्ण झाल्याचे नमुद करण्यात आले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू ५० योजना सन २००६-०७ मधील आहेत. त्यामध्ये टीएसपी यंत्रणा होती. उक्त योजनांपैकी १६ योजना अद्यापही प्रगती पथावर आहेत. सदरहू कामांच्या कार्यारंभ आदेशामध्ये ८-९ वर्षांचा कालावधी काम पूर्ण करण्यासाठी नमूद करण्यात आला होता का, यावर कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी खुलासा केला की, सन २०१२ मध्ये जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. आतापर्यंत ३४ योजनांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. काही योजना प्रकरणी अडथळा असल्याने ती पूर्ण होऊ शकली नाही.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू कामे केव्हा पूर्ण होतील, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी खुलासा केला की, आता सर्व कामे व्यवस्थित करण्यात येत आहेत. सदरहू कामे जिल्हा परिषदेस हस्तांतरीत केले आहे. कार्यकारी अभियंता व उप अभियंता निविदेच्या माध्यमातून कंत्राटदार नेमून करणार आहेत.उक्त १६ कामांची सद्य:स्थिती अशी आहे की, ३ कामांचे अंदाजपत्रक तयार केले आहे. ३ गावांच्या पाणी पुरवठ्याची कामे प्रगती पथावर आहेत. सदरहू योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. उर्वरित कामांसाठी डीएसआर दर जुने असल्याने डीएसआर बायपास करून पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार आहे. आता पाणी टाकीचा दर परवडत नाही कारण सद्यःस्थितीतील दर दुप्पट झालेले आहेत.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, सदरहू प्रकरणी विभागाच्या सचिवांनी सखोल चौकशी करावी. उक्त योजनांच्या कामांसाठी २४ महिन्यांचा कालावधी दिलेला असताना १६ योजनांची कामे सन २०१८ वर्ष संपत आलेले असताना पूर्ण झालेली नाहीत. तसेच, ५० पैकी ज्या ३६ योजना पूर्ण झालेल्या आहेत त्याची सद्यःस्थिती तपासून सखोल चौकशी करण्यात यावी. सदरहू प्रकरणी झालेल्या विलंबाची कारणे काय, त्यास जबाबदार कोण आहेत, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून १ महिन्यामध्ये सर्व कार्यवाही पूर्ण करावी व समितीला माहिती सादर करावी. सदरहू प्रकरणी जबाबदारी निश्चित करून टीएसपी कारवाईस पात्र असल्याने त्यांच्यावर कारवाई करून एक महिन्यामध्ये समितीस अहवाल सादर करण्यात यावा.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, बीड अंतर्गत राष्ट्रीय पेयजल व महाजल योजना ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविताना पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

देयकातून आयकराची २.२४ टक्के दराने रक्कम रुपये ३६,७१,१३९/- वसूल केलेली नाही. नोंदणीकृत ठेकदाराच्या देयकातून २% व्हॅटची रक्कम व अनोंदणीकृत ठेकेदाराच्या देयकातून ४ टक्के ऐवजी ५ टक्के व्हॅटची रक्कम रुपये ८१,७०,१६२/- वसूल केलेली नाही. कामगार विमा १ टक्के रुपये १७,७०,१०१/- व बांधकाम उपकर रक्कम १ टक्के रुपये १७,७०,१०१/- वसूल करणे आवश्यक आहे. तहसील कार्यालयाने जनगणनेचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. जनगणनेप्रमाणे अंदाजपत्रक करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील नियम १७४ मधील नमुन्यात देयक तयार करून पारित करणे आवश्यक असताना ती नमुना २९ मध्ये आकस्मित खर्चाच्या देयकावर तयार करून पारित केलेली आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा पारिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निर्दशनास आले की, जिल्हा परिषद, बीड राष्ट्रीय पेयजल व महाजल योजना ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतर्गंत एकूण ५० कामे आहेत. ३२ कामे दुरुस्तींची होती, त्यामध्ये १८ विहिरी होत्या. लेखा आक्षेपामध्ये दर्शविण्यात आलेली ५६ कामे पूर्ण झालेली आहेत. सदरहू कामे लेखा आक्षेपामध्ये येण्याचे कारण म्हणजे आक्षेपामध्ये जागेचे अभिलेखे नाही. आक्षेपामध्ये तपासणी अहवाल वाचले नाही, असे आक्षेप आहेत. सदर आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने पूर्तता केलेली आहे व कामे पूर्ण झालेली आहेत. तथापि, कामे पूर्ण झाल्यावर त्या त्या गावामध्ये पाणी पोहोचले आहे किंवा कसे व सदर योजना किती गावांनी हस्तांतरित करून घेतलेल्या आहेत. प्रत्यक्षात त्या गावांना पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे किंवा कसे ही माहिती समितीला साक्षीच्या वेळी अवगत करण्यात आली नाही. वास्तविक पहाता जिल्हा परीषदेला दोन महिन्यापूर्वी लेखा आक्षेप प्राप्त झालेले असताना सुद्धा माहिती प्राप्त करून घेतली नाही. सर्व प्रकिया केवळ कागदावर केल्या जातात. विहीर आहे परंतु विहीरीला  पाणी आहे की नाही हे माहीत नाही. नळ पाणी पुरवठा नियमित चालू आहे किंवा नाही, राष्ट्रीय पेयजल योजनेच्या अनेक योजना कागदावर पूर्ण होतात यामध्ये वर्गणीतून १० टक्के भरावयाची रक्कम अनेक ठिकाणी कंत्राटदाराच भरत असल्यामुळे पाईप लाईनच्या पाईपची साईज कमी होणे, ठराविक केजी नसणे असे प्रकार होतात व हे प्रकार १० टक्के रक्कमेकरिता होत असतात. त्यावर देखरेखीकरिता ४ टक्के रक्कम घेतली जाते. स्थानिक पातळीवरील (ग्राऊंड लेव्हल) समिती अहवाल देते व त्यावर दोन, तीन व्यक्ति मिळून स्वाक्षऱ्या करतात ही वस्तुस्थिती आहे, त्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निर्दशनास आले की, शासन निर्णय दिनांक २ मे, २००५ नुसार ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत नळ पाणी पुरवठा योजनांच्या कामांची अमंलबजावणी करावयाची होती. शासनाच्या महाजल व राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमामध्ये आक्षेपात नमूद असलेल्या ५० नळ पाणी पुरवठा योजना रखडलेल्या होत्या. तथापि, अभिप्रायामध्ये ५६ नमूद झालेले  आहे, ५० योजनांपैकी ३४ योजना अंतिम करून पाणी पुरवठा सुरू झालेला आहे. १६ योजना अद्याप प्रगतीपथावर आहेत. योजना रखडण्याची सर्वसाधारण कारणांची चौकशी केली असता जिल्हा स्तरावरून पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस वितरित केलेल्या निधीच्या समितीकडून अपहार झाल्याने ३ योजनांच्या समितीच्या अध्यक्ष / सचिव यांचे विरोधात एफ.आय.आर. दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. तसेच ४ योजनांबाबत संबंधित अध्यक्ष/ सचिव यांचे वैयक्तिक मालमत्तेवर बोजा ( आरआसी ) चढविण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २६ मे, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना ७/१२ वर बोजा टाकण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. **त्यानुसार निधीचा अपहार झाल्याप्रकरणी तीन योजनांच्या समितीचे अध्यक्ष/सचिव यांचेविरुद्ध एफ.आय.आर दाखल करण्यात आल्यानंतर न्यायालयीन निर्णयास अधीन राहून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे. तसेच ४ योजनांबाबत संबंधित अध्यक्ष/सचिव यांच्या वैयक्तिक मालमत्तेवर बोजा**

**(आरआरसी) चढवून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे याबाबत समितीस अवगत करण्यात यावे तसेच उक्त योजनांच्या कामांसाठी २४ महिन्यांचा कालावधी दिलेला असताना १६ योजनांची कामे सन २०१८ हे वर्ष संपत आलेले असताना पूर्ण झालेली नाहीत. ५० पैकी ३६ योजना पूर्ण झालेल्या आहेत. उर्वरित अपूर्ण योजना तातडीने पूर्ण करण्यात याव्यात तसेच योजना अपूर्ण राहण्याचे कारण काय याबाबतची तपासून सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीनुसार संबधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीचा सर्वंकष अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, बीड

## रुखमाई गोविंद मतीमंद निवासी विद्यालयाने देयकातून कपात रक्कम शासन खाती भरणा न करणे व इतर अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.९१७ (सन २०१२-१३)**

रुखमाई गोविंद मतीमंद निवासी विद्यालय यांचे वेतन देयके तपासताना निदर्शनास आलेल्या बाबींवर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

(१) शाळेने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून रुपये ६३,८८१/- इतका आयकर कपात केला आहे. परंतु आयकराची रक्कम शासन खाती भरणा केली नाही.

(२) वेतनाची अदायी बँकेच्या खातेवर वर्ग करणे आवश्यक असताना श्री.अनारसे बाबासाहेब दिनकर काळजी वाहक या कर्मचाऱ्यास वैयक्तिक धनादेश देऊन अदायी करून शासन निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

रुखमाई गोविंद मतीमंद निवासी विद्यालय संस्थेची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. संस्थेची मान्यता क्र.प्राउसकविऔ/नियोजन/मुकबधीर/मतीमंद विद्यालय/नोंद्रपरद्य/२०१५-१६/१०८४/औबाद, दिनांक १३ मे, २०१५ **(परिशिष्ट ४.१)** अनुसार रद्द करण्यात आली आहे व शाळेतील कर्मचारी आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील अतिरिक्त स्ववर्ग कक्षाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत.

(१) शाळेने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून आयकर कपातीची रक्कम रुपये ६३,८८१/- शासन खाती वेळेत भरणा न करणे आणि वेतनाची अदायी बँकेच्या खात्यावर वर्ग न करणे त्यामुळे संबंधित शाळेचे तत्कालिन कर्मचारी यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे. श्री.अनारसे बाबासाहेब दिनकर (काळजी वाहक) यांना सदरील धनादेश दिल्याची पोचपावती कार्यालयास उपलब्ध आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० जानेवारी २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, संबंधित अधिकाऱ्यांना शाळेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्याबाबत सांगण्यात यावे, अशी सूचना आहे. यावर जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संमती दर्शविली. यावर समितीने विचारणा केली की, संबंधित कर्मचाऱ्याचे निलंबन झालेले आहे. केवळ नोटीस देऊन चालणार आहे काय, शाळा बंद आहे. मान्यता रद्द करण्याची कारणे काय आहेत, त्या ठिकाणी अफरातफर किंवा अनियमितता झालेली आहे. सदरहू विषय अतिशय महत्त्वाचा आहे. मान्यता रद्द करण्याचा विषय ज्यावेळी आला त्यावेळी काही तरी ठोस कारण असणार आहे आणि ते समितीला सांगावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मतीमंद शाळा होती. मतीमंद शाळेतील संचालकांचा वाद होता आणि ते प्रकरण आता माननीय न्यायालयात आहे. सदरहू प्रकरण माननीय न्यायालयात न मिटल्याने मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेने पाठविलेला होता. यावर समितीने विचारणा केली की, मान्यता कशाच्या आधारे रद्द केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मंत्री महोदयांकडे सुनावणी झालेली आहे आणि त्या ठिकाणी दिलेल्या निर्देशानुसार मान्यता रद्द झालेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, शाळेत विद्यार्थी किंवा शिक्षक नसतील तर मान्यता रद्द केली जाते. याबाबत जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना वस्तुस्थिती काय आहे, ते माहीत असते. त्यानुसार मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव पुढे पाठविला जातो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, त्या ठिकाणी अंतर्गत भांडणे सुरू होती. यावर समितीने विचारणा केली की, भांडणे होती किंवा कसे, या प्रश्नाचे उत्तर मिळाल्यानंतर समितीला उप प्रश्न विचारण्यास मदत होणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू प्रश्नाच्या संदर्भात माहिती घेतल्याचे दिसून येत नाही. भांडणे असतील तर गुन्हे दाखल केले आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी माननीय सामाजिक न्यायमंत्री यांच्याकडे सुनावणी झालेली आहे. त्यानंतर माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशान्वये मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सुनावणी कशा संदर्भात झालेली आहे, समन्वयाचा अभास नसल्याने संस्थेची मान्यता रद्द केली जाऊ शकते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रादेशिक उप आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १३ मे, २०१६ रोजी आदेश रद्द केले आहेत. तो अधिकार आपला नव्हता. त्यांनी त्यांच्यात समन्वय नसल्यामुळे मान्यता रद्द केलेली आहे.

यावर समितीने निदेश दिले की, सदरहू लेखा आक्षेपासंदर्भात समितीला समाधानकारक उत्तर मिळाले नाही. सदरहू विषयासंदर्भात संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित केली जाईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

रखुमाई गोविंद मतीमंद विद्यालयाने देयकातून कपात रक्कम शासन खाती भरणा न केल्याबाबत व इतर अनियमिततेबाबत सामाजिक न्याय विभागाने पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्रश्नावलीच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, रुखमाई गोविंद मतीमंद निवासी विद्यालय या शाळेची पत्र क्र.प्राउसकविऔ/नियोजन मतिमंद/मुकबधीर/विद्यालय/ नोद्रपरद्य/ २०१५-१६/१०८४ औ.बाद, दिनांक १३ मे, २०१५ **(परिशिष्ट ४.१)** नुसार मान्यता रद्द करण्यात आली आहे. शाळेतील कर्मचारी आयुक्त, अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. शाळेने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून आयकर कपातीची रक्कम रुपये ६३,८८१/- शासन खाती वेळेत भरणा न करणे आणि वेतनाची अदायी बँकेच्या खात्यावर वर्ग न करणे त्यामुळे संबंधित शाळेचे तत्कालिन मुख्याध्यापक श्री.सरोदे संतोष रामभाऊ यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच श्री.अनारसे बाबासाहेब दिनकर या कर्मचाऱ्याचे वेतन वैयक्तिक खात्यावर जमा न करता संबंधित कर्मचाऱ्यांच्या नावे मुख्याध्यापक यांनी धनादेश देऊन रक्कम रोखीने अदा केलेली आहे. त्यामुळे नियमानुसार सदर कार्यवाही झालेली नाही. तत्कालिन मुख्याध्यापक श्री.सरोदे संतोष रामभाऊ सद्या जिल्हा समाजकल्याण कार्यालयात नाशिक येथे कार्यरत आहेत. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बीड अपंग विभाग यांचे पत्र क्र.५०/२०१७-१८, दिनांक ६ जानेवारी, २०१८ नुसार सदरील कर्मचाऱ्यांच्या वेतनातुन रक्कम रुपये ६३,८८१/- कपात करण्याबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नाशिक यांना कळविण्यात आले होते. परंतु अद्याप पर्यंत रक्कम कपात करण्यात आलेली नाही. सद्या श्री.सरोदे संतोष रामभाऊ हे विकास मंदिर (मतीमंद मुलांची शाळा) नाशिक येथे विशेष शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. जिल्हा समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, बीड यांच्यामार्फत दोन्ही प्रकरणांबाबत दिनांक २६ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये तत्कालिन मुख्याध्यापक श्री. सरोदे संतोष रामभाऊ यांना अंतिम नोटीस देण्यात आलेली आहे

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेच्या दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ८, ९ व १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये अंतिम नोटिस देण्यात आलेली आहे. परंतु, कारवाई काही झालेली नाही. या परिच्छेदासंदर्भातील सद्यःस्थिती सांगावी.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, या रखुमाई गोविंद मतीमंद निवासी विद्यालयाची मान्यता दिनांक १३ मे, २०१५ अन्वये रद्द करण्यात आली. तेथील कर्मचारी अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे वर्ग करण्यात आले होते. त्यांची आयकर कपातीची रक्कम ६३,८८१/- ही शासन खाती भरणा केली गेली नव्हती. ती रक्कम आता भरणा केलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, या विद्यालयाची मान्यता दिनांक १३ मे, २०१५ रोजी रद्द केली. त्यानंतर तेथील विद्यार्थ्यांचे कोठे समायोजन केले, आपण त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची कोणती पर्यायी व्यवस्था केली, की ती शाळा सुरूच आहे, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित होतो. ती शाळा पूर्ण बंद झाली व तेथील मुले दुसरीकडे कोठे गेली काय, याबाबतची सद्यःस्थिती सांगावी. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, तेथील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वर्ग केले.

यावर समितीने विचारणा केली की, वसतिगृहातील मुले आहेत. आपण ते विद्यालय बंद केले. ती पाचवी ते आठवीतील मुले असतील. त्यांच्या पुढच्या शिक्षणाबाबत जिल्हा परिषदेने कोणती व्यवस्था केली, त्यांच्याकरिता वसतिगृहामध्ये जेवण, राहणे अशा सर्व सुविधा असतात. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, ती मुले जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. विद्यार्थी दुसऱ्या गावातील असतील तर त्यांच्याकरिता वसतिगृहाची सुविधा असते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ते मतीमंद विद्यार्थी आहेत. हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्याकरिता जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वेगळी सोय नाही. त्यांच्याकरिता आपण वेगळ्या शाळा सुरू केलेल्या आहेत. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, आताची नवीन फिलॉसॉफी अशी आहे की, अशा विशेष मुलांनी नेहमी शाळेमध्ये शिक्षण घ्यावे याकरिता प्रयत्न करावेत. ते फारच मतीमंद नसतील तर त्यांना मुख्य प्रवाहाबरोबर घेऊन जावे, असाही एक विचार आहे. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मतिमंद मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत आल्यामुळे तेथील मुलांवर दुष्परिणाम होता कामा नये. खाजगी वसतिगृह रद्द केले आहे, त्याची मान्यता रद्द केली आहे. त्यामुळे तेथील मुलांची पर्यायी व्यवस्था करणे क्रमप्राप्त आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, पूर्वी आपण विशेष शाळा सुरू करीत होतो. आता धोरण असे आहे की, सर्वसाधारणपणे त्यांना नेहमी शाळांमध्ये मुख्य प्रवाहामध्ये ठेवावे.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, जिल्ह्यामध्ये इतर मतिमंद विद्यालये आहेत तेथे त्यांना समायोजित करून घेतले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही. सन २०१६ मध्ये Rights of Person with disabilities, 2016 हा नवीन नियम आला आहे, त्या नियमान्वये दिव्यांग विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या शाळांमध्ये पहिल्यांदा सामावून घ्यायचे आहे. तेथील शाळांनी त्यांना disable friendly २० प्रकारच्या सुविधा देणे बंधनकारक केले आहे.

यावर समितीने आपले मत व्यक्त केले की, सुविधा देणे बंधनकारक केले असले तरी त्यांना मेन्टेन करणारे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे, त्यांच्यासाठी वेगळे शिक्षक लागतात. यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

यांनी खुलासा केला की, सर्व शिक्षा अभियानामध्ये दिव्यांगांसाठी वेगळ्या शिक्षकांची तरतूद आहे आणि त्यांची नियुक्ती केली आहे. ग्रामीण भागामध्ये सर्व शिक्षा अभियानामध्ये नियुक्ती झालेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या शाळांची काय अवस्था आहे याची सचिवांना माहिती आहे. सचिवांनी पदभार स्वीकारल्यापासून काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, विषय शिक्षक असतात, ते पुरेशा प्रमाणात आहेत की नाही याची प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये स्थिती वेगळी असण्याची शक्यता आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, ठराविक मतीमंद मुलांसाठी शिक्षक वेगळे असतात. जर नेहमी शिक्षकांच्या ताब्यात मतीमंद मुलांना सोपविले तर त्यांचे जगणे कठीण होणार आहे. त्यामुळे सचिवांचे उत्तर समितीस समाधानकारक वाटत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी  यांनी खुलासा केला की, जिल्ह्यामध्ये ७० विशेष शिक्षक आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, समितीने १८ जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत. समितीला कुठेही जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सर्व शिक्षा अभियानामधून असे शिक्षक नेमले असल्याचे आढळून आलेले नाही. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, मतिमंदांमध्ये वेगवेगळे प्रकार आहेत. काही इतके पण मतीमंद नसतात की, त्यांना प्रत्यक्ष याची गरज भासते. गंभीर मतीमंद मुलांसाठी विशेष शाळा असतात.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, साधारणपणे आपण इन्क्लूझिव्ह एज्युकेशनचा विचार करतो त्यावेळी त्याच्या ४ कॅटेगरी आहेत. त्या ॲक्टमध्ये म्हटले आहे की, या ४ कॅटेगरीमध्ये जर इन्क्लूझिव्ह एज्युकेशन देणे शक्य नसेल तर त्यासाठी स्पेशल स्कूल आणि त्या ४ कॅटेगरी अशा आहेत, इंटलॅक्चुअल डिसॅबल, त्यानंतर मेन्टल डिसॅबल, सेरेब्रल पाल्सी आणि ऑटिझम या ४ कॅटेगरींना आपण स्पेशल स्कूलमध्ये पाठवायचे आहे. त्यांना आपण इन्क्लूझिव्ह एज्युकेशन देऊ शकत नाही.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कोणती मुले पाठविली, यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, जे ऑर्थोपेडिकली डिसॅबल असतात, हिअरिंग इम्पेअर्ड असतात, लो व्हीजन, ब्लाईंडनेस असे विद्यार्थी असतात. यानंतर समितीने विचारणा केली की, रखुमाई गोविंद ही शाळा बंद केल्यानंतर तेथील मुलांचे कोणकोणत्या शाळेत समायोजन केले त्या शाळांची नावे आणि गावांची माहिती समितीला देण्यात यावी.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, जिल्ह्यात १० मतिमंद शाळा आहेत, तेथे मुलांना समायोजित केले आहे. त्याची माहिती जिल्हा परिषदेकडून घेऊन समितीला दिली जाईल. यावर समितीने निदेश दिले की, हा गरीब कुटुंबातील मतीमंद मुलांचा गंभीर प्रश्न आहे. गरीब कुटुंबात अशा प्रकारची मुले जन्माला आल्यामुळे त्या परिवारावर मोठा आघात झाला आहे. त्यामुळे समितीला या संदर्भातील माहिती दिली पाहिजे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले की, प्रश्न रक्कम भरण्याचा होता, आम्ही ती रक्कम समायोजन केली आहे. यावर समितीने विचारणा केली की, शाळेची मान्यता रद्द केल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, याबाबतची माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल. यावर समितीने मत व्यक्त केले की, समाजकल्याण अधिकाऱ्यांना याची माहिती असणे आवश्यक आहे. एका शाळेपुरती मर्यादित माहिती विचारली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी समाजकल्याण अधिकाऱ्यांचा आढावा घेत नाहीत काय, सचिवांची साक्ष असताना अशा प्रकारे उत्तर दिले जाणार असेल तर प्रश्न कसा मार्गी लागणार आहे, जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेले उत्तर असमाधानकारक आहे. तेथील मुलांना कोणत्या शाळेत दाखल केले याची माहिती जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनी दिली पाहिजे. त्यांच्याकडे याची माहिती असलीच पाहिजे. बीड जिल्ह्यामध्ये समितीने दौरा केल्यानंतर हा प्रश्न उद्‌भवला आहे. अधिकाऱ्यांनी सचिवांना आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना माहिती न दिल्यामुळे

यांच्यावर कारवाई केली पाहिजे. समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तेथे मागासवर्गीय, गरीब कुटुंबातील मुली आपल्या पालकांना सोडून राहतात. त्या वसतिगृहातील बाथरुमला, शौचालयाला दरवाजे नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही याचे समितीला दुःख वाटते. शाळेने आवश्यक त्या सुविधा दिल्या पाहिजेत, किरकोळ असुविधा असतील तर मान्य करण्यात येतील, परंतु गंभीर दुरवस्था दिसून येते.

यावर प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी खुलासा केला की, हा प्रश्न अनुदानित वसतिगृहाच्या संदर्भात आहे. शासकीय वसतिगृहाच्या सर्व इमारती नवीन आहेत, त्या अद्यावत आहेत. खाजगी संस्थांमधील वसतिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांमागे ९०० रुपये अनुदान देण्यात येते. ज्या अनुदानित संस्था नियमांचे पालन करीत नाहीत त्यांच्या बाबतीत पथक नेमून तपासणी करू. एका जिल्ह्याची दुसऱ्या जिल्ह्यातील पथकामार्फत तपासणी करण्यासाठी भरारी पथक स्थापन करून सर्व अनुदानित वसतिगृहांची तपासणी करू.

दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजीच्या उर्वरित साक्षीदरम्यान समितीने विचारणा केली की, मागील बैठकीत बीड जिल्हा परिषदेची साक्ष घेण्यात आली होती, त्यावेळी अ.क्र. ५ परिच्छेद क्रमांक ३.९१७/१३ प्रलंबित ठेवण्यात आला होता. तो मुद्दा आता अगोदर चर्चेला घेण्यात येत आहे. मतीमंद मुलांची पर्यायी व्यवस्था कोठे करण्यात आली, यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती द्यावी. तसेच राज्य शासनाची बहुउद्देशीय सेवाभावी संस्था दगडी शहारणपूर येथे आहे. जिल्हा बीड, तालुका बीड अंतर्गत रुक्मीणीबाई गोंविद मतीमंद निवासी विद्यालय, ही मतीमंद शाळा समितीच्या सांगण्यावरुन बंद करण्यात आली होती. या शाळेतील मुलांची पर्यायी व्यवस्था प्रशासनाकडून कोठे करण्यात आली आहे. त्यावेळी त्यांच्याकडे उत्तर नव्हते. त्यामुळे तो विषय आज पुन्हा साक्षीच्या बैठकीला घेण्यात आला आहे. समितीसमोर त्यांनी लेखी माहिती सादर केली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या संदर्भातील लेखी माहिती समितीला सादर केली आहे. सदर शाळेची मान्यता दिनांक १३ मे, २०१५ रोजी रद्द करण्यात आली आहे. तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १९ जून, २०१५ रोजी पत्र निर्गमित केले होते, त्यामध्ये असे नमूद केले होते की, त्या शाळेतील विद्यार्थ्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यात यावे. त्यानंतर याबाबत माननीय न्यायालयाने दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी संस्थेला अंतरिम रिलिफ दिला. माननीय न्यायालयाने असेही आदेश दिले होते की, या मुलांची काळजी व त्यांचे इंटरेस्ट सेफगार्ड करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १७ व २२ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या पत्रात असे नमूद केले आहे की, अंबाजोगाई येथील संस्थेतील शाळेत सामावून घेण्यात यावे. त्यानुसार प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यानंतर माननीय न्यायालयाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी आदेश दिले त्या आदेशाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. त्या आदेशात असे नमूद केले आहे की, यापूर्वी दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी माननीय न्यायालयाने जे आदेश पारीत केले होते ते मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांनी चुकीचा समज केला. त्यांनी विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत टाकावे असे आदेश दिले होते, तशा पद्धतीचे आदेश माननीय न्यायालयाने अगोदर दिलेले नव्हते. दिनांक १९ जून, २०१५ च्या पत्रानुसार विद्यार्थ्यांना पालकांच्या स्वाधीन केले होते. तशा पद्धतीची कार्यवाही करण्यात यावी असे आदेश माननीय न्यायालयाने दिले होते. आज सर्व विद्यार्थ्यांची सद्यःस्थिती काय आहे ती विद्यार्थ्यांच्या नांवासह समितीकडे सादर करण्यात आली आहे. एकूण ८० विद्यार्थी होते, त्यापैकी १३ विद्यार्थी इतर चार मतीमंद विद्यालयात आहेत. त्याच संस्थेत १३ विद्यार्थी आहेत. दोन विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळेत आहेत.११ विद्यार्थी खाजगी शाळेत आहेत, उर्वरित ४१ विद्यार्थी पालकांकडे आहेत. सर्व विद्यार्थ्यांची नावे व पत्ते समितीकडे सादर केली आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, जे विद्यार्थी पालकांकडे आहेत ते शिक्षण घेत नाहीत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जे विद्यार्थी पालकांकडे आहेत त्या पालकांचे जिल्हा परिषदेने समुपदेशन केले आहे की, त्या विद्यार्थ्यांना विद्यालयात पाठविण्यात यावे. जी मुले पालकांकडे आहेत ती आता कोणत्याही विद्यालयात शिक्षणासाठी जात नाहीत. यावर समितीने विचारणा केली की, यासाठी आता काय उपाययोजना करण्यात येत आहे. शासनाचे धोरण आहे

की, कोणतीही मुले शाळाबाह्य राहता कामा नये. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या निरीक्षकांमार्फत पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे. त्यापद्धतीनुसार ३९ विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यात आले आहे. बाकीच्या विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. माननीय न्यायालयाच्या आदेशात असे नमूद केले आहे की, पुढील निर्णय होईपर्यंत या विद्यार्थ्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यात यावे.

यावर समितीने विचारणा केली की, पुढील निर्णय कधी होईल तोपर्यंत ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत काय, माननीय न्यायालयाचे पुढील प्रमाणे आदेश आहे "It is evident that exhibit XI was not before the court when the order against them was passed. This court could have never directed the Chief Executive Officer, Zilla Parishad, Beed to ensure that the students handed over to the parents should be once again admitted in the said school."

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तद्नंतर असा खुलासा केला की, "Never directed" असे आदेश माननीय न्यायालयाने दिलेले नाहीत. "said school" असे नमूद केले आहे. माननीय न्यायालयाच्या आदेशात असे नमूद केले होते की, ज्या मुलांना पालकांच्या स्वाधीन केले त्यांना पुन्हा शाळेत पाठवावे. दिनांक १७, १९ व २२ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या मुलांना अंबेजोगाई येथील शाळेत पाठवावे असे नमूद केले. पालकांकडे जे विद्यार्थी गेले आहेत त्यांना त्याच शाळेत पाठवावे असे माननीय न्यायालयाने आदेश दिलेले नाहीत. न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, या मुद्याबाबत एक्झीबीट एक्स-१ आहे तो न्यायालयासमोर आलेला नाही. एक्स-१ हे दिनांक १९ जून २०१५ चे पत्र आहे.

यावर समितीने विचारणा केली की, देयकातून कपात केलेली रक्कम शासन खाती भरणा न करणे असा मूळ प्रश्न होता. देयकातून रक्कम कपात करण्याची वेळ का आली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या विषयाचा पाठपुरावा झालेला आहे. कर्मचाऱ्यांचा आयकर कपातीचा हा विषय होता. ही कपात करण्यात आली होती. परंतु मुख्याध्यापक यांनी ती रक्कम आयकर विभागाकडे जमा केली नव्हती.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेचे ऑडीट झाले तेव्हा ही बाब लक्षात आली होती. जिल्हापरिषदेचे ऑडीट सन २०१३-१४ मध्ये झाले आहे. त्यानंतर लेखापरिक्षकाने अशी अनियमितता झाली असा आक्षेप काढला. आज २०१९ वर्षे सुरू आहे. या वर्षात आपण असे उत्तर देत आहात की, तत्कालिन मुख्याध्यापक श्री.सरोदे संतोष रामभाऊ यांना अंतिम नोटीस देण्यात आली आहे. म्हणजे आपण त्यांना मदत करीत आहात, त्यांच्यावर आतापर्यंत कारवाई का करण्यात आली नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तत्कालिन मुख्याध्यापकांना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी पहिली नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर त्यांची बदली नाशिक येथे झाली. तेथील समाज कल्याण अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. यावर समितीने विचारणा केली की, दिनांक २६ डिसेंबर, २०१८ रोजी मुख्याध्यापकांना अंतिम नोटीस देण्यात आली. हे प्रकरण सन २०१३ मध्ये लक्षात आले असून त्यावर कारवाईची नोटीस सन २०१८ मध्ये देण्यात येते. दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी एक नोटीस दिलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, प्रकरण उघडकीस आल्यावर किती दिवसात कारवाई पूर्ण केली पाहिजे यासंदर्भात कालबद्ध कार्यक्रम काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ७ जानेवारी, २०१९ रोजीचे चलन जोडण्यात आले आहे त्यानुसार रक्कम भरुन घेण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, प्रकरण उघडकीस आल्यावर कारवाई करण्यासंदर्भात कालबद्ध कार्यक्रम का नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, सदर शाळा बंद केली आहे. शाळा बंद केली असेल तर या शाळेतील शिक्षक व कर्मचारी कोठे गेले, त्यांचे समायोजन कोठे करण्यात आले.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर शाळेवर एकूण २६ कर्मचारी होते, त्यापैकी २२ कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले. ४ कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची प्रक्रिया सुरू असून ते कर्मचारी आता त्याच संस्थेत कामावर आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, आज शाळा बंद आहे की, सुरू आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर शाळेची मान्यता रद्द करण्यात आली आहे. माननीय न्यायालयाने दिनांक ७ फेब्रुवारी रोजी अंतरिम रिलिफ दिलेला आहे. न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत ' जैसे थे ' असे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे सदर शाळा सुरू आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शाळेची मान्यता रद्द करण्याचा आदेश काढला परंतु माननीय न्यायालयाने त्याला स्थगिती दिली. त्यामुळे आता शाळा सुरू आहे. यावर समितीने विचारणा केली की, शाळा सुरू असेल तर मुख्याध्यापक नाशिकला कसे जातील. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, २६ कर्मचाऱ्यांपैकी २२ कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले. ८० मधील काही विद्यार्थी दुसऱ्या शाळेत वर्ग करण्यात आले. १३ विद्यार्थी त्या शाळेत आहेत. यासंदर्भातील नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी घेतील. ही जर तर ची भाषा आहे, जर माननीय न्यायालयाने शाळा सुरू करण्याचा निर्णय दिला तर २२ कर्मचाऱ्यांना तेथे पुन्हा घेण्यात येईल.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, शाळा बंद करण्याला माननीय न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. इतर बाबींना स्थगिती नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जे आदेश दिले होते ते माननीय न्यायालयाने रद्द केले. त्यामुळे पूर्वी होते तसे आता झालेले आहे. त्यांना नवीन भरतीची परवानगी मिळाली तर त्या शाळेतील शिक्षकांना इतर ठिकाणी समायोजित केले त्यांना नवीन भरतीची परवानगी देण्यापूर्वी त्या शाळेवर पाठविण्यात यावे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे, यासंदर्भातील नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी घेतील व आपल्या म्हणण्यानुसार कार्यवाही करतील.

यावर समितीने विचारणा केली की, दिनांक १३ मे, २०१५ चा आदेश रद्द केला लेखापरिक्षक यांच्याकडून सन २०१२-१३ चा रिपोर्ट आपणाला सन २०१३-१४ मध्ये मिळाला असेल. अहवाल केव्हा मिळाला आहे. दिनांक १३ मे, २०१५ रोजी शाळा बंद करण्याचा आदेश काढला. माननीय न्यायालयाने ' जैसे थे ' असा आदेश कोणत्या तारखेला दिला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी माननीय न्यायालयाने ' जैसे थे ' चे आदेश दिले.

तद्नंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला तो सकृतदर्शनी बरोबर आहे, संस्थेची मान्यता रद्द झाली असेल तर संस्था चालकांना काहीच अधिकार राहत नाहीत. मुलांचे नुकसान होऊ नये याचा विचार केला जातो. ही शाळा पूर्वी अनुदानित होती त्यासाठी निधी शासनाकडून दिला जात होता. त्या शाळेचा कारभार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांभाळायला पाहिजे होते तसे झाल्याचे दिसत नाही. यावर समितीने मत व्यक्त केले की, मुलांना पालकांच्या स्वाधीन करण्यात आले ही बाब चुकीची झालेली आहे, त्या मुलांना शिक्षण मिळालेले नाही. त्या गरीब मुलांवर हा अत्याचार झालेला आहे. त्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले आहे. ४१ विद्यार्थी पालकांकडे आहेत त्यांना शाळेत आणण्यासाठी काय उपायोजना करण्यात आल्या आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ४१ विद्यार्थी पालकांकडे आहेत ते विद्यार्थी शाळेत येण्यासाठी त्या पालकांचे समुपदेशन करण्यात येते. माननीय न्यायालयाने त्यांच्या आदेशात असे नमूद केले आहे की, शाळेची कार्यपद्धती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पहावी त्यानुसार कार्यवाही करण्यात येत असून या शाळेची दोन तीन वेळा तपासणी करण्यात आली आहे. दिनांक १ मे, २०१८ पूर्वी तपासणी करण्यात आली होती. त्यावेळी हे विद्यार्थी हजेरीपटावर आढळून आलेले नाहीत. ते ' सतत गैरहजर ' अशा शेऱ्यामध्ये ते आढळून आलेले होते. त्यानंतर विद्यालयाने हे विद्यार्थी पालकांकडेच आहेत, असे सांगितलेले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, याबाबतची तपासणी जिल्हा परिषदेने केलेली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ती मतिमंद मुले आहेत. त्यांची यादी प्राप्त आहे. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी मतिमंद मुलांच्या घरी भेट दिलेली नाही. या प्रकारामध्ये केवळ निधी घेण्याचे काम झालेले आहे आणि यामध्ये अनियमितता आढळून येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने आपण काय कार्यवाही केली आहे, याची माहिती समितीला द्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या शाळेचे सन २०१५ पासून अनुदान बंद आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, शाळा बंद करण्याचा आदेश प्राप्त झाला होता. त्यानंतर तेथील शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे. चार शिक्षक सध्या त्या ठिकाणी आहेत. त्या चार शिक्षकांचे वेतन संस्थाचालक देत आहेत. जिल्हा परिषद किंवा शासनामार्फत त्यांचे वेतन दिले जात नाही. त्या शाळेमध्ये १३ विद्यार्थी आहेत. इतर मुलांना इतरत्र शाळेमध्ये पाठविण्यात आलेले आहे. अशा प्रकारची ही सर्व वस्तुस्थिती आहे.

यावर समितीने विचारणा केली की, परंतु मुळात ही शाळा सुरू करता येत नाही. त्यामुळे त्यांनी शाळा कोणत्या उद्देशाने चालविली. त्यामुळे संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय, माननीय न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे की, जिल्हा परिषदेनेच शाळा चालवावी. तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे होते. तसेच त्या शाळेतील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतली पाहिजे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, आजच्या स्थितीत जी काही कार्यवाही करावयाची आहे, ती माननीय न्यायालयास विचारुन करावी लागेल. माननीय न्यायालयाच्या पहिल्या आदेशानुसार न्यायालयास असे सांगावे लागेल की, त्या आदेशाची अंमलबजावणी योग्य प्रकारे झालेली नाही. त्यामुळे पहिल्या आदेशानुसार सदरहू शाळा हस्तांतरीत करण्यात येत आहे. तसेच त्या ठिकाणी असलेल्या चार शिक्षकांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने देखील माहिती द्यावी लागेल. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार शाळा चालविण्यात येईल. ही शाळा चालविताना काही शिक्षकांना पुन्हा घेता येईल. तसेच जे ४१ विद्यार्थी इतरत्र शिक्षण घेत आहेत त्यांना पुन्हा या शाळेमध्ये घेता येईल. जेणेकरून त्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये योग्य प्रकारे शिक्षण घेता येईल. त्याचप्रमाणे ही संस्थादेखील योग्य प्रकारे सुरळीत चालू राहू शकेल. दरम्यानच्या काळामध्ये ही संस्था कोण चालविणार याचा अंतिम निर्णय होत नाही, तो पर्यंत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे ती शाळा चालवतील. तो पर्यंत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सदरहू ४१ विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी प्रयत्न करावेत. तो पर्यंत माननीय न्यायालयाचा जो काही निर्णय होईल तो त्यानंतर लागू राहील.

## अभिप्राय व शिफारशी

जिल्हा परिषद, बीड अंतर्गत रुखमाई गोविंद मतिमंद निवासी विद्यालय यांचे वेतन देयक तपासताना पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. शाळेने कर्मचाऱ्यांच्या वेतनातून रुपये ६३,८८१/- इतका आयकर कपात केला आहे. परंतु आयकराची रक्कम शासन खाती भरणा केली नाही, वेतनाची अदायी बँकेच्या खात्यावर वर्ग करणे आवश्यक असताना काळजी वाहक कर्मचाऱ्यास वैयक्तिक धनादेश देऊन अदायी करून शासन निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, शाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनातून आयकर कपात करण्याबाबत सूचना होत्या, आयकर कपातीची रक्कम रुपये ६३,८८१/- शासन खाती वेळेने भरणा करण्यात आली नाही. उक्त रक्कम आता भरणा केलेली आहे आणि वेतनाची अदायी बँकेच्या खात्यावर वर्ग करण्यात आली नाही त्यामुळे शाळेचे तत्कालिन संबंधित मुख्याध्यापक यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१७ अन्वये नोटीस देण्यात आली आहे. मुख्याध्यापकांनी धनादेश देऊन रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या नावे रोखीने अदा केलेली आहे, त्यामुळे नियमानुसार कार्यवाही झालेली नाही. तत्कालिन

मुख्याध्यापक सध्या जिल्हा समाजकल्याण कार्यालय, नाशिक येथे विकास मंदीर (मतिमंद मुलांची शाळा) येथे विशेष शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, बीड अपंग विभाग यांचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ नुसार सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून रक्कम रुपये ६३,८८१ कपात करण्याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नाशिक यांना कळविण्यात आले होते. परंतु रक्कम कपात करण्यात आलेली नाही. जिल्हा समाजकल्याण कार्यालय, जिल्हा परिषद, बीड यांच्यामार्फत दोन्ही प्रकरणांबाबत दिनांक २६ डिसेंबर, २०१८ च्या पत्रान्वये तत्कालिन मुख्याध्यापक यांना अंतिम नोटीस देण्यात आलेली आहे, परंतु कारवाई झालेली नाही. त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

रखुमाई गोविंद मतिमंद निवासी विद्यालयाची मान्यता दिनांक १३ मे, २०१५ अन्वये रद्द करण्यात आली आहे. तेथील कर्मचारी अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे वर्ग करण्यात आले होते व तेथील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वर्ग करण्यात आले आहे. एकूण ८० विद्यार्थी होते त्यापैकी १३ विद्यार्थी इतर चार मतिमंद विद्यालयात आहेत, त्याच संस्थेमध्ये १३ विद्यार्थी आहेत. २ विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळेत आहेत. ११ विद्यार्थी खाजगी शाळेत आहेत. उर्वरित ४१ विद्यार्थी पालकांच्या स्वाधीन करण्यात आल्यामुळे सदरहू विद्यार्थींना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, ही बाब अंत्यंत चिंताजनक व गंभीर आहे. **सन २०१६ मध्ये दिव्यांग व्यक्तीच्या अधिकारासंबंधात करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना संबंधित शाळांनी २० प्रकारच्या सुविधा देणे बंधनकारक केलेले आहे. असे असतानाही सदर ४१ विद्यार्थी शाळेत नियमितपणे यावेत यासाठी जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी त्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे केवळ समुपदेशन न करता त्या विद्यार्थ्यांच्या घरी भेट देऊन ते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याकरिता विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी संबंधित विद्यार्थ्यांना शाळेत सामावून घेण्याबाबत तातडीने कारवाई करावी. सदर विद्यार्थ्यांचे कोणत्याही परिस्थितीत शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच याप्रकरणी जे अधिकारी कर्मचारी दोषी असतील त्यांचेविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, बीड
## तांडावस्ती सुधार योजनेतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.९१८/२३ सन (२०१२-१३)**

पंचायत समिती, आष्टी यांनी वरील योजनेवर प्राप्त अनुदानातून रुपये ३,२०,६४०/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :--

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १८७ नुसार कामावर वापरलेले साहित्य गुणनियंत्रक विभागाकडून तपासणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १९९ (२) नुसार पुर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही ठेवलेली नाही तसेच स्थावर मालमत्ता नोंदवहीत कामाची नोंद घेतलेली नाही.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट-२४ मधील नियम १३२ व नियम १५ नुसार देयक पारीत झाल्यानंतर तिरक्या रेषा मारलेल्या नाहीत.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. १०६९/प्र.क्र.५६/३५, दिनांक ३० जून, २००० नुसार कामावर वापरलेल्या साहित्याच्या पावत्या घेतलेल्या नाहीत.

(५) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९६८ चे परिशिष्ट-५ शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एसटीसीपी १०६६/२४०१७४ एस, दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ नुसार करारनाम्यावर दोन साक्षिदारांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता, १९६८ चे नियम १७४ नुसार अतिप्रदानाचे देयक नमुना ५ मध्ये तयार न करता नमुना ४६ वर तयार केला आहे. तसेच कामाची प्रगती नोंदवही व.न.न. ६९ काम पूर्ण नोंदवहीत घेतलेली नाही.

(७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.झेडपी ७-२००/ प्रक्र.४४/९९, दिनांक २२ ऑक्टोबर, २००४ नुसार एका कामास एक अशी मोजमाप पुस्तिका ठेवलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते :--

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ नुसार कामावर वापरलेले साहित्य गुणनियंत्रण विभागाकडून तपासणी करून चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १९९ (२) नुसार पुर्ण झालेल्या बांधकामाची नोंद ग्रामपंचायतच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीत नोंद घेण्यात आलेल्या आहेत. नोंदवहीची सत्यप्रत अवलोकनार्थ सादर.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. १०५ प्र.क्र५६/३५ दिनांक ३० जून, २००० नुसार देयक पारीत झाल्यानंतर तिरक्या रेषा मारण्यात आलेल्या आहेत.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. १०५ प्र.क्र.५६/३५ दिनांक ३० जून, २००० नुसार कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याच्या पावत्या घेण्यात आलेले आहेत. सोबत पावत्या जोडण्यात आलेल्या आहेत. पा. २०३,३१५, १ ते १६.

(५) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९६८ व परिशिष्ठ-५ शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एस.टी.सी.पी. १०६६/२४०१७४ एस, दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ नुसार करारनाम्यावर दोन साक्षीदाराच्या सह्या घेण्यात आलेल्या असून सोबत करारनाम्याची सत्य प्रत जोडण्यात आलेली आहे.

(६) कामाची प्रगती नोंदवही ठेवण्यात आलेली असून व न.न ६९ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(७) मोजमाप पुस्तिका कमी असल्या कारणाने जिल्हा परिषदेकडे मोजमाप पुस्तिका मागणी करण्यात आलेल्या होत्या, यापुढे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, चाचणी अहवाल केव्हा प्राप्त झाला, चाचणी अहवाल उपलब्ध नसताना देयकाची पूर्ण रक्कम कशी अदा केली, लेखा परीक्षणास नोंदवही उपलब्ध न केल्याने दंडात्मक कारवाई केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दंडात्मक कारवाई केली नाही. दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी चाचणी अहवाल प्राप्त झालेला होता. सन २०१२-२०१३ मध्ये देयके देण्यात आलेली आहेत. यावर समितीने सूचना केली की, सदरहू परिच्छेदाच्या अनुषंगाने चौकशी करून दंडात्मक कारवाई करावी. तसेच सेवा पुस्तिकेत नोंद करण्यात यावी आणि एक वेतनवाढ रोखण्यात यावी.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, चाचणी अहवाल नसताना देयके दिलेली असल्यामुळे संबंधितांच्या विरोधात कोणती कारवाई केलेली आहे, चाचणी अहवाल केव्हा घेणे अपेक्षित होते आणि तो अहवाल प्रत्यक्षात केव्हा घेतलेला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, चाचणी अहवाल देयके देण्यापूर्वी घेणे अपेक्षित आहे.

त्यानंतर समितीने विचारणा केली की, ५ वर्षानंतर कोणत्या अधिकाऱ्यांनी चाचणी अहवालावर स्वाक्षरी केलेली आहे, चाचणी अहवाल केव्हा घेणे अपेक्षित होते आणि तो अहवाल प्रत्यक्षात केव्हा घेतलेला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, चाचणी अहवालाचा नमुना दिल्याची तारीख ६ डिसेंबर, २०१३ अशी आहे, हा अहवाल लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध नव्हता. समितीने पुढे विचारणा केली की, सन २०१३ मध्ये संबंधित अधिकारी कोण होते आणि सन २०१७ मध्ये कोणते अधिकारी आहेत, सन २०१७ मध्ये ज्या अधिकाऱ्याने चाचणी अहवाल दिलेला आहे, अशा संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, गट विकास अधिकारी यांनी पंचायत समिती स्तरावरुन देयक अदा केलेले आहे. तत्कालिन गट विकास अधिकारी आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी होते. चाचणी अहवाल भ्रष्ट आहे. तद्नंतर समितीने सूचना केली की, ज्यांनी अहवाल दिलेला आहे असे अधिकारी आणि संबंधित गट विकास अधिकारी यांनी कोणतीही शहानिशा न करता देयक दिलेले असल्यामुळे अशा दोघांना निलंबित करण्यात यावे. लेखाआक्षेप आल्यानंतर संबंधितांनी चाचणी अहवाल दिलेला नव्हता. संबंधितांना देयके देण्याचे काम झालेले आहे. गुणवत्ता नियंत्रणने सन २०१७ मध्ये अहवाल दिलेला आहे. यासंदर्भात आक्षेप आलेला आहे. नोंदवही आणि चाचणी अहवाल उपलब्ध झालेला नाही. सकृतदर्शनी हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी. चौकशी अंती दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भातील प्रस्ताव तात्काळ शासनाकडे पाठविण्यात यावा. तसेच या प्रकरणी अनियमितता झालेली आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाई, सेवापुस्तिकेत नोंद आणि एक वेतनवाढ रोखण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

तांडावस्ती सुधार योजनेतील अनियमिततेबाबत पंचायत समिती, आष्टी प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती दोषी आढळून आलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे का, असल्यास याप्रकरणी दंडात्मक कारवाई, सेवापुस्तिकेत नोंद आणि एक वेतनवाढ रोखण्याच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की,

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १८७ नुसार कामावर वापरलेले साहित्य गुणनियंत्रण विभागाकडून तपासणी करून चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १९९ (२) नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंद ग्रामपंचायतच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या आहेत. नजरचुकीने दाखविणे राहीले आहे.

(३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.१०५ प्र.क्र.५६/३५, दिनांक ३० जून, २००० नुसार देयक पारीत झाल्यावर तिरक्या रेषा मारण्यात आलेल्या आहेत.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.१०५ प्र.क्र.५६/३५ दिनांक ३० जून, २००० नुसार कामावर करण्यात आलेल्या पावत्या घेण्यात आलेल्या आहेत.

(५) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९६८ परिशिष्ट-५ शासन महसूल व वनविभाग परिपत्रक क्र.एस.टी.सी.पी. १०६६/२४०१७४ दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ नुसार करारनाम्यावर दोन साक्षीदारांच्या सह्या घेण्यात आलेल्या आहेत.

(६) कामाची प्रगती नोंदवही ठेवण्यात आलेली असून नमुना नं.६९ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(७) मोजमाप पुस्तिका कमी असल्याकारणाने जिल्हा परिषदेकडे मोजमाप पुस्तिका मागणी करण्यात आलेल्या होत्या. यापुढे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवण्याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच लेखा परिक्षणामध्ये दाखविलेल्या मुद्यांची ग्रामविकास अधिकारी पंचायत समिती यांनी पुर्तता केलेली आहे. त्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही अथवा सेवा पुस्तिकेत नोंद किंवा एक वेतनवाढ रोखणे याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(८) तांडा/वस्ती सुधार योजनेमधील अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे स्तरावर चौकशी सुरू आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, बीड यांच्या अनुपालनाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, तांडावस्ती सुधार योजनेतील अनियमिततेबाबत माहिती देण्यात यावी. सदर प्रकरणी काय कारवाई केलेली आहे,

यावर विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाचे सहसचिव यांनी खुलासा केला की, सदरहू कामाचा चाचणी अहवाल घेण्यात आला नाही, असा आक्षेप होता. पण तो चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे. तसेच सदर कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आली नाही, असा आक्षेप घेण्यात आला होता, पण तशी नोंद मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेली आहे. जेव्हा आक्षेप घेण्यात आला तेव्हा सदर कामाची नोंद स्थावर मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आली नव्हती. ग्रामपंचायतीच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीमध्ये सदर कामाच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या आहेत. पण नजरचुकीने दाखविणे राहिले आहे.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अशा प्रकारच्या चुका नजरचुकीने कशा होऊ शकतात, म्हणजे पेपर सोडविताना नजरचूक झाली पुन्हा पेपर सोडविण्यासाठी द्यायचा असे जमेल काय, असे उत्तर विभागास तरी समाधानकारक वाटते काय, विमुक्त जाती भटक्या जमाती विभागाचे सह सचिव यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत सदर प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सदर प्रकरणातील चौकशी मुद्दे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे मांडले. गुणवत्ता नियंत्रण अहवाल न घेताच त्यांनी सदर कामाची देयके दिलेली होती. यासंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत म्हणून जे संबंधित जबाबदार होते त्यांच्याकडून २५ हजार रुपयांची वसुली करून तशी नोंद त्यांच्या सेवा पुस्तिकेमध्ये करण्यात आलेली आहे. गुणवत्ता नियंत्रण अहवाल सन २०१७ मध्ये देण्यात आल्यामुळे संबंधित प्रयोगशाळा अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबतचे पत्र कार्यकारी अभियंता, बांधकाम यांना देण्यात आलेले आहे.

समितीने विचारणा केली की, सदर मालाचा पुरवठा झाल्यानंतर त्या मालाचा वापर करण्यापूर्वी चाचणी अहवाल मागविण्यात आला होता काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच प्रयोगशाळा अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबतचे पत्र कार्यकारी अभियंता, बांधकाम यांना दिलेले आहे. सन २०१२ च्या कामाचा सन २०१७ मध्ये गुणवत्ता नियंत्रण चाचणी अहवाल दिलेला आहे. गुणवत्ता नियंत्रण अहवाल प्राप्त होण्यापूर्वीच सदर मालाचा वापर केला, त्याबाबत अभिलेखे सादर न केल्याप्रकरणी आणि २५ हजार रुपये दंड अशी कारवाई संबंधितावर केलेली आहे. सदर काम एकूण ९८ हजार रुपयांचे होते, त्यापैकी दंड स्वरुपात २५ हजार रुपये वसूल केलेले आहेत. जो अहवाल आलेला आहे, तीच सामग्री वापरण्यात आली होती. त्याबाबत गुणवत्ता नियंत्रण कार्यालयाला पत्र पाठविलेले आहे.

गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्याकडे जी सामग्री पाठविण्यात आली होती, त्याच सामग्रीचा वापर करून सदर बांधकाम केलेले आहे, याबाबत सदर कामाची चौकशी केलेली आहे, सदर काम करण्यात आलेले आहे.

तद्नंतर समितीने असे मत व्यक्त केले की, सदर आक्षेपामुळेच सन २०१२ च्या कामाचा अहवाल सन २०१७ मध्ये मागितला आहे. जिल्हा परिषदेने नमुना तपासणीसाठी दिला व त्याचा अहवाल दिलाच नाही, असे होऊ शकत नाही. सन २०१२ च्या कामाचा चाचणी अहवाल मागवून संबंधित कार्यकारी अभियंता यांना संरक्षण दिलेले आहे. यावर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी खुलासा केला की, असे जर झाले तर प्रयोगशाळा अधिकाऱ्याला हाताशी धरून सदर अहवाल तयार केला असे सिद्ध होते.

जिल्हा परिषदेने विम्याचे पैसे अदा केल्याप्रकरणी समितीने सूचना केली की, राज्यातील कामगारांना राज्य बांधकाम कामगार विमा योजनासारख्या २८ योजना लागू केलेल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या सर्व कंत्राटदारांना सूचित केले पाहिजे की, राज्य बांधकाम कामगार विमा योजनेमध्ये ज्या कामगारांनी नोंदणी केली आहे, अशाच कामगारांना काम करण्यास परवानगी दिली पाहिजे. या योजनेमध्ये ८५ रुपयांमध्ये ५ वर्षांचे संरक्षण आहे. इमारतीचे किंवा रस्त्याचे काम करीत असताना दुर्दैवाने एखादा कामगाराचा मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांचा विमा मिळतो. असे असताना देखील १ टक्का विमा कपात करण्याचे काम सुरू आहे. यापुढे १ टक्का विमा कपात बंद करावी. तसा शासन निर्णय निर्गमित करावा. नोंदणीकृत कामगारांना कामावर घेऊन त्यांची यादी जिल्हा परिषदेला सादर करावी.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, आष्टी यांनी तांडावस्ती सुधार योजनेवर प्राप्त अनुदानातून रुपये ३,२०,६४०/- इतका खर्च केला आहे. याबाबत पुढील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १८७ नुसार कामावर वापरलेले साहित्य गुणनियंत्रण विभागाकडून तपासणे आवश्यक होते. तसेच उपरोक्त लेखासंहितेच्या नियम १९९ (२) नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही ठेवलेली नाही. अतिप्रदानाचे देयक नमुना ५ मध्ये तयार न करता नमुना ४६ वर तयार केले आहे. कामाची प्रगती नोंदवही व न.न. ६९ काम पूर्ण नोंदवहीत घेतलेली नाही व स्थावर मालमत्ता नोंदवहीत कामाची नोंद घेतलेली नाही, बांधकाम नियम पुस्तिकेत देयक पारीत झाल्यानंतर तिरक्या रेषा मारलेल्या नाहीत. ग्रामविकास विभागाच्या दिनांक ३० जून, २००० रोजीच्या शासन निर्णयानुसार कामावर वापरलेल्या साहित्याच्या पावत्या घेतलेल्या नाहीत, करारनाम्यावर दोन साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या नाहीत, एका कामास एक अशी मोजमाप पुस्तिका ठेवलेली नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी गुणनियंत्रण विभागाकडून कामावर वापरलेल्या साहित्याचा चाचणी अहवाल प्राप्त झालेला होता व सन २०१२-२०१३ मध्ये देयके देण्यात आलेली आहेत. सदर चाचणी अहवाल देयके देण्यापूर्वी घेणे अपेक्षित आहे. तथापि, चाचणी अहवाल नसताना देयके दिलेली आहेत. त्यामुळे अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तत्कालिन गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती स्तरावरुन देयक अदा केलेले आहे. तसेच सदर कामाची नोंद ग्रामपंचायतीच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आली नाही असा आक्षेप घेण्यात आला होता पण तशी नोंद मालमत्ता नोंदवहीमध्ये नोदविण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीमध्ये सदर कामाच्या नोंदी नोंदविण्यात आलेल्या आहेत पण नजरचुकीने दाखविणे राहीले असल्याचे विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाच्या सह सचिवांनी नमूद केले आहे. तांडावस्ती सुधार योजनेच्या निकषानुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ च्या विविध तरतुदींचे व सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियमांचे पालन करणे आवश्यक असताना व ते तसे केल्याचे कागदपत्रांसह लेखापरीक्षणाच्यावेळी लेखापरीक्षकांनी मागणी केल्यावर त्यांना सादर करणे अत्यावश्यक असतानाही या सर्व प्रक्रियेची या प्रकरणी पूर्तता झाल्याची आढळून येत नाही. त्यामुळे ज्या उद्देशासाठी सदरहू योजना सुरू केली त्याची फलश्रृती होत नसल्याने ही योजना शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्यास अडथळा निर्माण होतो, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

तसेच गुणवत्ता नियंत्रण अहवाल प्राप्त करून न घेता तांडावस्ती सुधार योजनेच्या कामाची देयके दिलेली होती. यासंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून रुपये पंचवीस हजारांची वसुली करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये करण्यात आलेली आहे, याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे. तांडावस्ती सुधार योजनेच्या कामाच्या साहित्याचा गुण नियंत्रण अहवाल सन २०१७ मध्ये देण्यात आल्यामुळे संबंधित प्रयोगशाळा अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबतचे पत्र कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना देण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधित प्रयोगशाळा अधिकाऱ्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.

**तांडावस्ती सुधार योजनेचे निकष, जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहितेच्या तरतुदी व सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियमांचे या प्रकरणी पालन करण्यात आले नाही ही बाब अत्यंत गंभीर असल्याने समितीने तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. राज्यातील कामगारांना राज्य बांधकाम कामगार विमा योजनांसारख्या २८ योजना लागू केलेल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या सर्व कंत्राटदारांना सूचित केले पाहिजे की, राज्य बांधकाम कामगार विमा योजनेमध्ये ज्या कामगारांची नोंदणी केली आहे अशा कामगारांना काम करण्यास परवानगी देण्यात यावी व नोंदणीकृत कामगारांना कामावर घेऊन त्यांची यादी जिल्हा परिषदेला सादर करण्यात यावी. इमारतीचे किंवा रस्त्याचे काम करीत असताना दुर्देवाने एखाद्या कामगाराचा मृत्यू झाल्यास त्या कामगाराच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांचा विमा मिळतो तरीदेखील १ टक्का विमा कपात करण्याचे काम सुरू आहे. सदर १ टक्का विमा कपात बंद करण्यात यावी व त्याप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करावा अशी समिती शिफारस करीत आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, बीड

## लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत

**१. परिच्छेद क्रमांक ३.२०३ (सन २०१२-१३)**

**अनुसूचित जाती विशेष घटक विद्यार्थ्यांना उपस्थिती भत्ता वाटपातील अनियमिततेबाबत :-**

पंचायत समिती, आष्टीने सन २०१२-२०१३ मध्ये अनुसूचित जाती विशेष घटक योजनेवर रुपये २,१७,८१६/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :--

(१) सन २०१२-२०१३ मध्ये झालेल्या शाळानिहाय पट पडताळणीचे अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाहीत त्यामुळे पटसंख्येप्रमाणेच उपस्थिती भत्ता वाटप केल्याचे तपासता आले नाही.

(२) विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडलेले नाही.

(३) उपस्थिती भत्ता मागणी पत्रामध्ये जातीचा उल्लेख मुख्याध्यापकांनी केलेला नाही.

(४) मुख्याध्यापकांनी उपस्थिती भत्ता वाटप केल्याचा अहवाल गट शिक्षणाधिकारी यांना पाठविलेला नाही.

(५) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवि-२००९ प्र.क्र.२१३/०९ कार्यासन-७, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ दिवसासाठी अनुज्ञेय आहे व मासिक हजेरी ७५% पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. परंतु हजेरीपट लेखापरीक्षणास दर्शविले नाहीत. त्यामुळे उक्त शासन निर्णयाचे पालन केल्याबाबत तपासणी करता आली नाही.

(६) उपस्थिती भत्ता शालेय शिक्षण सभापती, अध्यक्ष व सचिव तसेच पालक यांचे समक्ष वाटप करून पत्रकावर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते :--

(१) सन २०१२-२०१३ मध्ये झालेल्या शाळानिहाय पटपडताळणी अहवाल उपलब्ध असून त्याच्या सत्य प्रति अवलोकनार्थ सादर आहे.

(२) लाभार्थी विद्यार्थ्यांचे अनुसुचित जातीचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडलेले नसून केंद्र स्तरावर उपलब्ध होते त्या नुसार पट संख्येप्रमाणेच पात्र लाभार्थीना उपस्थिती भत्ता वाटप केल्याची खात्री केली आहे. त्याच्या सांक्षाकित प्रती अवलोकनार्थ सादर.

(३) मुख्याध्यापकांनी देयकासोबत जोडलेल्या मागणी पत्रात जातीचा संवर्ग तपशील नमूद नसून उपस्थिती भत्ता मागणी पत्रामध्ये जातीचा उल्लेख करण्यात आलेला आहे. जातीच्या संवर्गाची नोंद असलेल्या उपस्थिती भत्ता मागणी मूळ याद्या गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, आष्टी येथे उपलब्ध असून त्याच्या सत्य प्रती अवलोकनार्थ सादर.

(४) लेखा संहिता नियम ७७ (२) नुसार मुख्याध्यापकांनी उपस्थिती भत्ता वाटप केलेला अहवाल गटशिक्षणाधिकारी यांना पाठविलेला आहे. त्याच्या सत्य प्रति अवलोकनार्थ सादर करत आहोत.

(५) अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय क्र. अविवि २००१/प्रक्र/२१३/०९, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ नुसार प्रति विद्यार्थी प्रति दिन १ रुपये कमाल २२० दिवसांसाठी अनुज्ञेय आहे व मासिक हजेरी ७५ % पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. त्यानुसार हजेरी पट प्रमाणे उपस्थिती भत्ता वाटप करण्यात आलेला आहे. त्यांच्या साक्षांकित प्रती अवलोकनार्थ सादर.

(६) उपस्थिती भत्ता शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सचिव तसेच पालक यांच्या समक्ष वाटप केले आहे. वाटप पत्रावर संबंधितांच्या स्वाक्षरी घेण्यात आल्या आहेत. वाटप रजिस्टर शाळास्तरावर / केंद्र स्तरावर उपलब्ध आहेत. त्याच्या साक्षांकित प्रती अवलोकनार्थ सादर.

**२. परिच्छेद क्रमांक ३.६८५ (सन २०१२-१३)**

**केंद्र व राज्य पुरस्कृत गळीत धान्य विकास योजनेतील पीक उत्पन्न संरक्षण उपकरणे पुरवठा देयकातील अनियमिततेबाबत :--**

जिल्हा परिषद, बीड सन २०१२-२०१३ (परिच्छेद क्रमांक २) - २४०१ - ६७७१ योजना संकेताक लेखाशिर्ष अभिकरण गळीत धान्य विकास योजना केंद्र ७५% व राज्य २५% हिस्सा या लेखा शिर्षाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रुपये २,२६,३४१/- पीक उत्पन्न संरक्षण उपकरणे खरेदी करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) शासन मार्गदर्शक सूचना सन २०११-१२ व सन २०१२-१३ प्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर सदर योजनेस तांत्रिक मान्यता दिलेली नाही व १००% रब्बी व खरीप हंगामामध्ये योजना राबविण्यात कृषि विभाग असफल झालेला आहे.

(२) ता.क्र.तंत्र योजना प्रकल्प विस्तार/३४०-११ औरंगाबाद दिनांक २८ एप्रिल, २०११ प्रपत्र (ब) सन २०११-१२ प्रमाणे सुधारित कृषि औजाराची उपकरणाचा व सेवा उपलब्ध होण्यासाठी स्वतंत्र रोजगारी सेवा पुरवठादार गट तयार करून स्थानिक गरजेनुसार स्वयंसंस्था व लाभार्थ्यांना औजारे वाटप करण्यात आले नाहीत.

(३) १०० हेक्टर मध्ये १ ते १० शेतकऱ्यांचे गट तयार करणे योजनेनुसार प्रस्तावित आहे. या प्रकल्पावर रुपये २५,०००/- खर्च करण्यात तरतूद असतांना असे प्रकल्प राबविले नाहीत.

(४) विविध पीक विकास योजना आ.क्र.तंत्र/०९ योजना प्रकल्प विस्तार ३९०१-११, दिनांक २८ एप्रिल, २०११ प्रमाणे पीक उपकरणे हे आय.एस.आय. मार्कचे असले बाबत जिल्हा परिषदेने तपासले नाही.

(५) लाभार्थी निवड यादी प्रमाणे कृषि औजारे लाभार्थ्यांना वाटप केले गेले नाहीत.

(६) कृषि व पणन विभाग, शासन निर्णय क्र.सु.औ. २०११.प्र.क्र.३१/११ क्षे, दिनांक २२ नोव्हेंबर, २०११ प्रपत्र २ मार्गदर्शक सूचना क्र. १५ नुसार औजारांचा पुरवठा पूर्ण गुणवत्ता व दर्जा तपासणी पूर्व ९०% रक्कम ठेकेदारास अदा केली आहे.

(७) शासन मार्गदर्शक सूचना २०१२-१३ प्रमाणे १६% तरतूद अनुसुचित जाती, ८% अनुसुचित जमाती व ३०% तरतूद अल्प व अंत्यअल्प महिला शेतकरी या प्रमाणात राबविण्यात आली नाही.

(८) लाभार्थ्यास लोकवाटा वसूल झाल्यानंतर लाभ धारकास साहित्य वाटप करण्याच्याा सूचना असतांना साहित्य वाटप झाल्यानंतर लोकवाटा वसूल केलेला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते :--

(१) केंद्र पुरस्कृत गळीत धान्य विकास कार्यक्रम सन २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात मा.आयुक्त स्तरावरून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना नुसार राबविण्यात आला आहे. योजनेचा फायदा शेतकऱ्यांना झालेला असून त्याच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

(२) सुधारीत कृर्षी अवजाराचा पुरवठा शासन मान्य पुरवठादार संस्था महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून करण्यात आलेला असून विक्री पश्चातही त्यांच्याकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शक / सेवा देता येतात. तसेच ही अवजारे गरजू शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेली आहेत.

(३) १०० हेक्टर मध्ये १ ते १० शेतकऱ्यांचे गट तयार करून जिल्ह्यात जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून विविध प्रकल्प राबविण्यात येतात.

(४) पिक संरक्षण उपकरणे हे आय.एस.आय. मार्क चे शासनमान्य पुरवठादार संस्थेकडून गुणवत्ता तपासणी करूनच पुरवठा झाला असून तो सुस्थितीत प्राप्त झाल्यानंतर गटविकास अधिकरी पोहच देतात.

(५) कृषि अवजारे घेण्यापूर्वी लाभार्थ्यांना विचारणा करून अवजारे मागणी नोंदविण्यात येते. परंतु काही शेतकरी त्यांच्या वैयक्तीक अडचणीमुळे आणि ५०% अनुदानावर घ्यावयाची असल्यामुळे घेतीलच असे होत नाही. गरजू तसेच लोकवर्गणी भरणा केलेल्या पात्र लाभधारकांना वाटप करण्यात आलेली आहेत.

(६) मार्गदर्शक सुचनेप्रमाणे अवजारांचा पुरवठा झाल्यानंतर रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(७) शासन निर्णयास अधिन राहून १६% अनुसुचित जाती ९% अनुसुचित जमाती ३०% अल्प व अत्यल्प महिला शेतकरी यांना लाभ देणे आहे. तथापि योजनेच्या अटी प्रमाणे लाभ दिलेला असून वर्गवारीनुसार स्वतंत्र नोंद घेतली नसली तरी या पुढे स्वतंत्र नोंदी घेण्याची दक्षता घेण्यात येईल.

(८) लाभधारकाकडून लोकवर्गणी जमा करून घेवूनच औजारे वाटप करण्यात आलेली आहेत.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.७६४ (सन २०१२-१३)**

**यंत्र व साधन सामुग्री खरेदीबाबत :-**

जिल्हा परिषद बीड, सन २०१२-२०१३ यंत्र सामुग्री व साधन रुपये १,२७,०५४/- खरेदी केली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभाग व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र.डिआयएस-२००९ प्र.क्र.४३५/पशु-४,दिनांक ५ मार्च, २०१० मधील अट क्र. २० नुसार यंत्र उपकरणे खरेदी करतांना जुन्या साहित्याची विल्हेवाट लावणेबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. अट.क्र. १८ नुसार शासनमान्य संस्थेकडून गुणवत्ता चाचणी प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक असताना सदरील कार्यवाही झाली नाही.

(२) दरकरार अटीनुसार मागणी डाक पोहोच देय पत्राद्वारे नोंदविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झाली नाही. साहित्याचा पुरवठा विहित मुदतीत झाले बाबतची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

(१) अ. पशुवैद्यकीय दवाखान्यातील जुन्या निरुपयोगी साहित्याचे निर्लेखनास या कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या मान्यतेचे आदेश सोबत जोडले आहेत. तसेच निरुपयोगी साहित्याच्या प्रत्यक्ष लिलावाद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासन खाती जमा केलेल्या चलनांच्या प्रती अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात येत आहेत. (पृष्ठ क्र १३ ते २०)

ब. शासन निर्णय दिनांक ५ मार्च, २०१० मधील अट क्र.१८ नुसार हत्यारे, अवजारे, उपकरणे, यंत्र सामुग्री इ. रुपये १०,०००/- पेक्षा जास्त रकमांच्या उपकरणांची चाचणी प्रयोग शाळेतून किंवा इतर शासन मान्यता प्राप्त संस्थेकडून करून घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार खरेदी केलेल्या साहित्याच्या रकमा रुपये १,०००/- पेक्षा कमी असल्याने सदरची बाब लागू नाही. सोबत अवलोकनार्थ पुरवठा आदेशाच्या प्रती जोडल्या आहेत.

(२) अ. दर करार अटीनुसार मागणी पुरवठा नोंदविताना डाक पोहोच देय पत्राद्वारे नोंदविणे आवश्यक आहे. तथापि, कार्यलयामार्फत तांत्रिक सुलभतेसाठी ईमेलद्वारे पुरवठा आदेश निर्गमीत करण्यात आले व साध्या टपालाद्वारे मागणी नोंदविल्याचे जावक नोंदविल्याचे क्र. १० अ. मधील पृष्ठ क्र. १७८,१७९ व जावक नोंदवही क्र. १२ अ. मधील पृष्ठ क्र. १३४, १३५, १३७ च्या प्रती सोबत जोडल्या आहेत. (पृष्ठ क्र. २४ ते २६) ब. इमेल व टपालद्वारे नोंदविलेल्या साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत झाला असून कार्यालयाचे पुरवठा आदेश सबंधित डिलीव्हरी चलनाच्या प्रती अवलोकनार्थ सोबत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. (पृष्ठ क्र. २१ ते २३ व २७ ते २९)

**(४) परिच्छेद क्रमांक ३.९१८ (सन २०१२-१३)**

**तांडावस्ती सुधार योजनेतील अनियमिततेबाबत :**

पंचायत समिती, आष्टी यांनी वरील योजनेवर प्राप्त अनुदानातून रुपये ३,२०,६४०/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १८७ नुसार कामावर वापरलेले साहित्य गुणनियंत्रक विभागाकडून तपासणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १९९ (२) नुसार पूर्ण झालेल्या बांधकामाची नोंदवही ठेवलेली नाही तसेच स्थावर मालमत्ता नोंदवहीत कामाची नोंद घेतलेली नाही.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट-२४ मधील नियम १३२ व नियम १५ नुसार देयक पारीत झाल्यानंतर तिरक्या रेषा मारलेल्या नाहीत.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. १०६९/प्र.क्र.५६/३५ दिनांक ३० जून, २००० नुसार कामावर वापरलेल्या साहित्याच्या पावत्या घेतलेल्या नाहीत.

(५) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९६८ चे परिशिष्ट-५ शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एसटीसीपी १०६६/२४०१७४ एस, दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ नुसार करारनाम्यावर दोन साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

(६) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ चे नियम १७४ नुसार अतिप्रदानाचे देयक नमुना ५ मध्ये तयार न करता नमुना ४६ वर तयार केला आहे. तसेच कामाची प्रगती नोंदवही व.न.न. ६९ काम पूर्ण नोंदवहीत घेतलेली नाही.

(७) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र.झेडपी ७-२००/ प्रक्र.४४/९९, दिनांक २२ ऑक्टोबर २००४ नुसार एका कामास एक अशी मोजमाप पुस्तिका ठेवलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम ८७ नुसार कामावर वापरलेले साहित्य गुणनियंत्रण विभागाकडून तपासणी करून चाचणी अहवाल घेण्यात आलेला आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ चे नियम १९९ (२) नुसार पुर्ण झालेल्या बांधकामाची नोंद ग्रामपंचायतच्या स्थावर मालमत्ता नोंदवहीत नोंद घेण्यात आलेल्या आहेत. नोंदवहीची सत्यप्रत अवलोकनार्थ सादर.

(३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. १०५ प्र.क्र. ५६/३५ दिनांक ३० जून, २००० नुसार देयक पारीत झाल्यानंतर तिरक्या रेषा मारण्यात आलेल्या आहेत.

(४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. १०५ प्र.क्र.५६/३५ दिनांक ३० जून २००० नुसार कामावर वापरण्यात आलेल्या साहित्याच्या पावत्या घेण्यात आलेले आहेत. सोबत पावत्या जोडण्यात आलेल्या आहेत. पा. २०३,३१५, १ ते १६.

(५) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९६८ व परिशिष्ट-५ शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एस.टी.सी.पी. १०६६/२४०१७४ एस. दिनांक १७ फेब्रुवारी, १९७२ नुसार करारनाम्यावर दोन साक्षीदाराच्या सह्या घेण्यात आलेल्या असून सोबत करार नाम सत्य प्रत जोडण्यात आलेली आहे.

(६) कामाची प्रगती नोंदवही ठेवण्यात आलेली असून व न.न ६९ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(७) मोजमाप पुस्तिका कमी असल्याकारणाने जिल्हा परिषदेकडे मोजमाप पुस्तिका मागणी करण्यात आलेल्या होत्या, यापुढे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक ३.९१९ (सन २०१२-१३)**

**स्वयंरोजगारासाठी अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (बीज भांडवल) :-**

जिल्हा परिषद बीड सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षामध्ये स्वयंरोजगारासाठी अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (बीज भांडवल) रुपये ५,१९,०००/- प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अपंग - २००८ प्र.क्र. २०१२/ सुधार ३, दिनांक ०२ जुलै, २०१० नुसार अपंग व्यक्तींना लघुउद्योगासाठी वित्तीय सहाय्य देण्याबाबत सूचना आहेत व त्यामध्ये ठरवून दिलेल्या अटींचे पालन झाले किंवा नाही याच्या तपासणीसाठी अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.

(२) सदर योजनेचे अनुदान दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजी प्राप्त असून खर्च दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी केला आहे.

(३) वितरीत अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र घेतले नाही.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ७७ नुसार प्रदान रकमेची पोच घेतलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

(१) महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.अपंग-२००८ पत्र क्र. २०१२ /सुधार-३ दिनांक ०२ जुलै २०१० नुसार अपंग व्यक्तींना लघुउद्योगासाठी वित्तीय सहाय्य देणेबाबत सूचना आहेत व त्यामध्ये ठरवुन दिलेल्या अटीचे पालन केलेले आहे. लाभार्थी निहाय तपशील दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे. लेखा परिक्षणास अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करून न दिलेल्याबाबत जबाबदार कर्मचारी श्री. बांगर, एस.एच. वै.शा.का. यांना रुपये २५,०००/- दंडात्मक कार्यवाही दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी आदेशाद्वारे करण्यात आली आहे.

(२) लाभार्थीस बँकेमार्फत प्रत्यक्ष कर्ज मंजूर होणे व त्यानुसार २० टक्के सबसिडी अनुदान अदा करणे या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी साधारणपणे २ महिन्यांचा कालावधी लागतो त्यामुळे यामध्ये विलंब झालेला नाही. वर्ष अखेरपर्यंत रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.

३) वितरीत अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

४) सदर लाभार्थीस अनुदान वाटप केलेल्या पोच पावत्या सोबत जोडण्यात आलेल्या आहे.

**६) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (१६) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| **अ.क्र.** | **जिल्हा परिषदेचे नाव** | **जिल्हा परिषदेचा विभाग** | **लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक** | **गुंतलेली रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ३५ | बीड | सामान्य प्रशासन | १६ | ७६,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षासाठी सामान्य प्रशासन विभागांतर्गत संगणक प्रिन्टर मशिनसाठी आवश्यक असणाऱ्या टोनरकरिता दरपत्रके मागवण्यात येऊन कमी दर असलेले प्रिंटर प्रतिटोनर ७५०/- व कॅनॉन प्रिन्टर टोनर प्रतिटोनर २२००/- प्रमाणे दरास मान्यता घेऊन वेळोवेळी आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात अलेली असून प्रमाणक क्र. ११४/३-१४ रुपये ६४,८००/- व प्रमाणक क्र. ११५/३-१४ रुपये ११,२००/- लेखा परिक्षणास साठा नोंदवहीसह उपलब्ध करून देण्यात आलेले असून त्यांची तपासणी केलेली आहे.

लेखा परिक्षण कालावधीत संबंधित दरपत्रकाची नस्ती उपलब्ध होऊ शकलेली नसल्याने लेखा परिक्षकांना दर्शविण्यात आलेली नाही. सदरील नस्ती सद्यःस्थितीत उपलब्ध असून अवलोकनार्थ सादर.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (सुधारण २०११) नियम ७ अन्वये संबंधितास दंड वसुलीची नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला होता. संबंधिताचा खुलासा अमान्य करून रुपये २५,०००/- एवढी दंडाची वसुली करण्यात आली असून सोबत चलनाची साक्षांकित प्रत जोडली आहे.

**७) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (५४) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| **अ.क्र.** | **जिल्हा परिषदेचे नाव** | **जिल्हा परिषदेचा विभाग** | **लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक** | **गुंतलेली रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ३६ | बीड | सामान्य प्रशासन | ५४ | ६,६५,९५०/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

लेखा परिक्षणास सदर अभिलेखे सादर न केल्याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.लेखाप २०१३/(७/१३) वित्त-८, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ अन्वये संबंधित कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आलेली असून संबंधितांना याबाबत सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत सरपंच व सदस्य मानधन बैठक भत्ता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे आदेश क्र. साप्रविक्र/पं.२/कावि-पआक्र. २८३/२०१२-१३ दिनांक १८ जानेवारी २०१३ या आदेशान्वये ग्राम पंचायतनिहाय मंजूर केलेली असून त्यानुसार देयक पंचायत विभागाकडून लेखा विभागाकडे दिनांक ३० मार्च २०१३ रोजी ग्रामपंचायत निहाय सादर करून ग्रामपंचायतच्या थेट बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आलेली आहे. सदर अनुदान जमा केलेले देयक संचिका विभागामध्ये उपलब्ध आहे. तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या किमान वेतनासाठी प्राप्त अनुदानाची रक्कम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे आदेश साप्रवि ७/पं४/कावि पआक्र. २४३/२०१३ दिनांक १८ जानेवारी २०१२ नुसार माहे जून, २०१२ ते डिसेंबर, २०१२ चा

निधीचे देयक पंचायत विभागाकडून लेखा विभागास दिनांक ३० मार्च २०१३ रोजी ग्रामपंचायतनिहाय सादर करून रक्कम ग्रामपंचायतच्या थेट बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. सदर कर्मचारी मानधन हे ग्रामपंचायतच्या बँक खाती जमा केलेली देयक संचिका अवलोकनार्थ सादर.

तसेच वाटप केलेले अनुदान तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | ७०२ | ३० मार्च, २०१३ | १५,०५०/- | ग्रामपंचायत सदस्यांना सदस्य बैठक सत्ता माहे जून, २०१२ डिसेंबर, २०१२ |
| २ | ७०२ | ३० मार्च, २०१३ | २७,३००/- | ग्रामपंचायत सरपंच मानधन माहे जून, २०१२ ते डिसेंबर, २०१२ |
| ३ | ७०३ | ३० मार्च, २०१३ | ५८,१००/- | ग्रामपंचायत सदस्यांना सदस्य बैठक भता माहे जून, २०१२ ते डिसेंबर, २०१२ |
| ४ | ७०४ | ३० मार्च, २०१३ | १,०९,२००/- | ग्रामपंचायत सरपंच मानधन माहे जून, २०१२ ते डिसेंबर, २०१२ |
| ५ | १०७ | ३० मार्च, २०१३ | ९७,६५०/- | ग्रामपंचायत कर्मचारी मानधन माहे जून, २०१२ ते डिसेंबर, २०१२ |
| ६ | १०६ | ३० मार्च, २०१३ | ३,५८,६५०/- | ग्रामपंचायत कर्मचारी मानधन माहे जून, २०१२ ते डिसेंबर, २०१२ |
| | | एकूण | ६,६५,९५०/- | |

सदर मुद्याच्या अनुषंगाने संबंधित सर्व अभिलेखे विभागामध्ये लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (सुधारणा २०११) नियम ७ अन्वये संबंधितास दंड वसुलीची नोटीस देऊन दंडाची रक्कम रुपये २५,०००/- वसुली करून प्रशसकीय कार्यवाही सुरू केली आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (८२) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज

समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३७ | बीड | शिक्षण | ८२ | १,७५,०६,८४७/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

पंचायत समिती परळीच्या लेखा परिक्षणात शालेय पोषण आहार व अल्पसंख्यांक गणवेश, गटशिक्षणाधिकारी प.सं.परळी वै.कें.प्रा.श. पिंप्री बु., के,प्रा.शा, पिंपळगांव या संबंधित अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध केलेले नव्हते. त्या त्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी २०१३ व दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ नुसार लेखापरिक्षणाला अभिलेखे सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यावर विभागामार्फत कार्यवाही करण्यात आलेली आहे. लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० (सुधारणा २०११) मधील कलम ०७ नुसार रुपये २५,०००/- दंड वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. सन २०१२-१३ या कालावधीतील परिच्छेदातील मुद्याच्या अनुषंगाने सर्व अभिलेखे उपलब्ध आहेत. त्याच्या साक्षांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

| | |
|---|---|
| शापोआ व अल्पसंख्यांक गणवेश | ८४,४०,३९०/- |
| गटशिक्षण कार्यालय, परळी वै. | १९,२६,८४२/- |
| के.प्रा.शा.पिंपरी बु. | ४३,४८,३६८/- |
| के.प्रा.शा.पिंपळगाव | २७,९१,२४७/- |
| एकूण रक्कम रुपये | १,७५,०६,८४७/- |

**(९) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (६०) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचीत केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज

समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ८३ | बीड | ग्रामीण पाणीपुरवठा | ६० | ५६,६५,९४२/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

विशेष घटक योजने अंतर्गत ८ साधी विहीरीचे व ३३ नळ योजना विस्ताराची कामे करण्यात आली होती व त्यामधील सर्व कामे अंतिम झालेली आहेत. शासन परिपत्रकाप्रमाणे ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव हे लेखा परिक्षणास आवश्यक अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी जबाबदार असतात. अभिलेखे उपलब्ध करण्या-बाबत साशंकता निर्माण झाल्यामुळे अभिलेखे समितीकडून उपलब्ध होऊ शकले नाहीत. आता सदर अभिलेखे समितीकडून उपलब्ध झालेली आहेत.

### (१०) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (३९) (सन २०१२-१३)

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचीत केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ८४ | बीड | समाज कल्याण | ३९ | --- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परिक्षा अधिनियम १९६१ तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग ७-७-२००६ नुसार ग्रामपंचायतचे लेखापरिक्षण करण्यासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्या दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल अशी तरतुद आहे.

समाजकल्याण विभाग अंतर्गत (३६) अनुदानित अपंग मतीमंद शाळा आणि अनुदानित (७३) वसतीगृहाच्या मु.अ.अधीक्षक यांनी लेखी परिक्षणास अभिलेखे दर्शविले नाहीत म्हणुन दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्राद्वारे दंडात्मक कार्यवाही बाबत नोटीस देण्यास आलेल्या आहेत. संबंधीत सर्व शाळा वस्ती गृहाचे अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध आहे. तरी अनुपालन स्विकारण्यात यावे.

**(११) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (०८) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ८५ | बीड | कृषी | ०८ | १७,०४,१०६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

पंचायत समिती, गेवराई येथे लेखा परिक्षणाच्या वेळी कार्यरत असलेले कृषि अधिकारी (विशेष घटक योजना) यांनी लेखापरिक्षणास अभिलेखे न दर्शविल्यामुळे संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली असून रुपये २५०००/- दंड वसुल करून प्रशासकीय कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तरी अनुपालन स्विकारण्यात यावे.

**(१२) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (७६) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ७६ | बीड | गेवराई | २ | १८,४४,१२२/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

सन २०१२-१३ या वर्षात स्थानिक निधी लेखा बीड यांनी पंचायत समिती गेवराई अंतर्गत पंचातय समिती उपकरातून विविध विकास कामाचे संबंधीलेखापरीक्षण करण्यात आले आहे. स्थानिक निधी परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद असलेल्या कामासंबंधी मुळ प्रमाणेके लेखा परीक्षणाला सादर करण्यात आले आहे. सदर कामासंबंधी मुळ सुचिका व इतर अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून न दिल्याबाबत आक्षेप नोंदविला आहे तरी परिच्छेदातून नमूद असलेल्या प्रमाण क्रमांक १ दिनांक ७ जून २०१२ रुपये १७३०४/- वाहन क्रमांक एम.एच.२३ एफ ५० इंधनाविषयी खर्च असून त्याची रक्कम रुपये १७,३०३/- अशी आहे. तसेच तहसीलदार रॉयल्टी रुपये ७४,९९५/- ऐवजी रुपये ७४,४९५/- असे आहे. ती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी धनादेश क्रं. ३३२३९ ने तहसीलदार गेवराई यांना सादर करण्यात आली आहे. परिच्छेदात नमूद असलेले

प्रमाणकाविषयी सर्व संबंधितास या कार्यालयाचे प.क्र.जा.क्र. पसगे/लेखा/कावि/१८२२/२०१७ दिनांक २३ नोव्हेंबर २०१७ व संदर्भ क्रमांक १ ते १७ अन्वये लेखी सूचना देऊन वेळोवेळी अवगत करण्यात आले होते. त्याप्रमाणे खालील अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | प्रमाणे क्रमांक | दिनांक | रक्कम | कामाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | १ | १६.१.२०१३ | ३४,१२८/- | ग्रा.प.चव्हाणवाडी |
| २) | २ | १६.१.२०१३ | ६८,२५६/- | ग्रा.म.नि.जवळका |
| ३) | ३ | १६.१.२०१३ | ३४,१२८/- | ग्रा.प.मिरकाळा |
| ४) | ४ | १६.१.२०१३ | ३४,१२८/- | ग्रा.प.टाकळगाव |
| ५) | ५ | १६.१.२०१३ | ३४,१२८/- | ग्रा.प.बेलगाव |
| ६) | ६ | २६.१.२०१३ | ६८,२६३/- | ग्रा.प.मानमोडी |
| ७) | ७ | १६.१.२०१३ | १,५२,३४९/- | ग्रा.प.पाचेगाव |
| ८) | ३ | ३०.३.२०१२ | ५०,७८२/- | ग्रा.प.पाचेगाव |
| ९) | ४ | ३०.३.२०१२ | ३४,१३१/- | ग्रा.प.मानमोडी |
| १०) | ५ | ३०.३.२०१२ | ३४,१२८/- | ग्रा.प.टाकळगाव |
| ११) | ६ | ३०.३.२०१२ | ६८,२७२/- | ग्रा.प.जवळका |
| १२) | २ | १०.१०.२०१२ | ८५,४७१/- | ग्रा.प.कुरणर्पिप्री |
| १३) | ३ | १०.१०.२०१२ | ८५,८२४/- | ग्रा.प.धारटा |
| १४) | १ | १०.१०.२०१२ | ४७,५००/- | ग्रा.प.मानमोडी |
| १५) | २ | ३१.५.२०१२ | ८१,२९५/- | ग्रा.प.बाबुलतारा |
| १६) | ५ | ३१.५.२०१२ | ८१,०९४/- | ग्रा.प.सुर्डी |
| १७) | १ | १७.६.२०१२ | १७,३०३/- | इंधन खर्च |
| १८) | १ | ३१.८.२०१२ | ४१,५४८/- | ग्रा.प.सिरसदेवी |
| १९) | २ | ३१.८.२०१२ | ४१,५४८/- | ग्रा.प.राक्षसभुवन |
| २०) | ३३२३९ | ३१.८.२०१२ | ७४,४९५/- | तहसीलदार रॉयल्टी |

तसेच खालील अभिलेखे सर्व संबंधिताना सूचना देऊनही आज तागायत लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

| अ.क्र. | प्रमाणे क्रमांक | दिनांक | रक्कम | कामाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | १ | ३१.५.२०१२ | ७८,३१२/- | ग्रा.प.मन्यारवाडी |
| २) | ३ | ३१.५.२०१२ | ८०,१०४/- | ग्रा.प.कुरणपिंप्री |
| ३) | ४ | ३१.५.२०१२ | ७९,७००/- | ग्रा.प.धारटा |
| ४) | २ | २८.३.२०१२ | ९५,०००/- | ग्रा.प.गुंणतेगाव |
| ५) | १ | ५.९.२०१२ | ४८,५१८/- | ग्रा.प.खळेगाव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६) | २ | २६.९.२०१२ | २४,१४०/- | ग्रा.प.मुळकवाडी |
| ७) | १ | ७.३.२०१३ | ४७,५००/- | ग्रा.प.तांदळा |
| ८) | २ | ३०.३.२०१२ | ३०,०००/- | बापु रामा खटके घरकुल |

वरील प्रमाणाकासंबधी अभिलेखे मोजमाप पुस्तिका, संचिका ही वरील अनु. क्र.१,२,३,५,६, व ८ ग्रामीण पाणी पुरवठा ही विभागाशी संबंधीत असून सर्व संबधिताना त्या विषयी अवगत करण्यात आले आहे. लेखापरिक्षणास विहित वेळेत आभिलेखे सादर न केल्याबाबत शासन परिपत्रक ग्राम विकास व जल संधारण विभाग क्रमांक लेखाप - २०१३ ७/१३ वित्त दिनांक ११ फेब्रुवार २०१३ व सुधारित परिपत्रक ग्राम विकास व जल संधारण क्रमांक लेखाप -२०१३/पक्र८१/वित्त-५ दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ प्रमाणे सर्व संबधितावर कार्यवाही करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आली असून संबधिताकडून रुपये २५०००/- हजार दंड वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच उपलब्ध अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध असल्याबाबत सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा बीड यांना या कार्यालयाचे प क्रमांक/पसगे/लेखा/१८५१/१७ दिनांक १ डिसेंबर २०१७ अन्वये कळविले आहे.

**(१३) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (७७) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ७७ | बीड | अंबाजोगाई | ३२ | -- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा परीक्षा अधिनियम, १९६१ तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक ७ जुलै २००६ नुसार ग्रामपंचायतचे लेखापरिक्षण करण्यासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल तरतुद आहे. पंचायत समिती अंबाजोगाईचे लेखापरिक्षण स्थानिक लेखा परीक्षा यांच्या कार्यालयामार्फत लेखापरीक्षण सुरू झाल्यानंतर पंचायत समिती अंतर्गत असणारे सर्व ग्रामपंचायतींना लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी तारीख निहाय ग्रामपंचायतींना कार्यक्रम ठरून दिला होता. त्यानुसार खालीलप्रमाणे ठरून दिला होता. त्यानुसार खालील प्रमाणे ग्रामपंचायती १ काळवटीतांडा, २ ममदापूर पाटोदा ३ धावडी, ४ मुडेगांव ५ अंबलवाडी, ६ पोखडी, ७ मालेवाडी, वरील ग्रामपंचायतींना लेखापरिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून घेणे संदर्भात कळवुनही उपलब्ध करून दिले नाहीत. त्यामुळे त्यांना नोटीसा बजावुन अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायतींना लेखी पत्र पाठवुन लेखापरिक्षणास आवश्यक असणारे सर्व रजिस्टर, रोख पुस्तक व सर्व प्रकारचे व्हॉउचर उपलब्ध करून देण्यास पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. त्या नुसार सर्व ग्रामपंचायतींनी अभिलेख लेखापरिक्षण उपलब्ध करून दिलेले नाहीत परिच्छेद क्र. ३२ मध्ये कोणतीही रक्कम दाखवण्यात आलेली नाही.

**(१४) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (७८) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्या बाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **पंचायत समितीचे नाव** | **लेखापरिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| ७६ | बीड | शिरुर | ३२ | -- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येते.

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरिक्षा अधिनियम, १९६१ तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक ७ जुलै २००६ नुसार ग्रामपंचायतचे लेखापरिक्षण करण्यासाठी अभिलेखे उपलब्ध न झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल तरतुद आहे. पंचायत समिती शिरूर (का.) चे लेखापरिक्षण स्थानिक लेखापरिक्षा यांच्या कार्यालयामार्फत लेखापरीक्षण सुरू झाल्या नंतर पंचायत समिती अंतर्गत असणारे सर्व ग्रामपंचायतींना लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी तारीख निहाय ग्रामपंचायतींना लेखी पत्र पाठवुन लेखापरिक्षणास आवश्यक असणारे सर्व रजिस्टर, रोख पुस्तक व सर्व प्रकारचे प्रमाणके उपलब्ध करून देण्यास पत्राद्वारे कळविणात आलेले होते व त्यानुसार सर्व ग्रामपंचायतींनी अभिलेख लेखा-परिक्षण उपलब्ध करून दिलेले आहेत. परंतु ग्रामपंचायत खबालिबा, जाब, जाटनांदुर वारणी, निमगाव (मा), बोरगाव (च) या ग्रामपंचायतीने लेखापरिक्षणास अभिलेखे न दर्शविल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रमांक पंसशि/आस्था-२/कावि/१५८८/२०१७, दिनांक १८ डिसेंबर २०१७ अन्वये सदरील कालावधीचे अभिलेखे न दर्शविल्यामुळे रुपये २५,०००/- दंड वसुली ची कार्यवाही मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० (सुधारणा, २०११) कलम ७ नुसार कारणे दाखवा नोटीसा सदरील ग्रामपंचायतच्या ग्रामसेवकांना देण्यात आलेले आहेत. तसेच ज्या सदरील ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण झाले नाही. त्याची अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध आहेत. तरी अनुपालन स्विकारण्यात यावे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १०, ११ व १२ जानेवारी २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील ज्या परिच्छेदांमध्ये "अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत" या संदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत अशा प्रकरणात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची कार्यवाही तसेच दोषींवर एक वेतनवाढ रोखून त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेण्याचे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

(२) भविष्यात लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होऊ नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) संबंधित अधिनियमात दुरुस्ती करून रुपये ५०,०००/- दंड अथवा परिच्छेदातील एकूण रक्कमेच्या १० % इतकी रक्कम दंड म्हणून आकाराण्याची तरतुद करण्याची वित्त विभाग कारवाई करेल काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आक्षेपाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास तपासणीकरिता ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी कागदपत्रे दाखवली नाहीत अशा अधिकारी व कर्मचारी यांचेविरुद्ध महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये दंड रक्कम १०० रुपये पर्यंत सुधारित अधिनियम दिनांक १० मार्च, २०११ अन्वये रुपये २५,०००/- पर्यंत दंड रक्कम वसुल करण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे रक्कम वसुल केली आहे.

| अ.क्र. | वर्ष | दंडीत कर्मचारी संख्या | सेवापुस्तिकेत नोंद घेतलेले संख्या | दंड |
|---|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | १३ | १३ | रुपये २५,०००/- प्रत्येकी |

याबाबतची सविस्तर माहिती परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केलेली असून ती सोबत देण्यात येत आहे. परिच्छेद क्रमांक ३.६८५, ३.९१८ संबंधित परिच्छेद लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध न करून देणे या बाबीशी निगडीत नाहीत त्यामुळे परिच्छेदांसंदर्भात दंड वसुलीची कार्यवाही करण्यात आली नाही. परिच्छेद क्रमांक ३.७५१ जिल्हा परिषद, बीड शी संबंधित नाही. तरी अनुपालन स्वीकारण्यात यावे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७) :-**

(१) दंडात्मक वसुलीची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरुन करण्यात आली आहे.

(२) लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यासंदर्भात दिनांक ३० मार्च २०१६ रोजी सुधारित परिपत्रक निर्गमित केले आहे.

(३) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मध्ये सुधारणा करण्याची बाब वित्त विभागाशी संबंधित असून याबाबत वित्त विभागास कळविण्यात येईल, त्या विभागाच्या निर्णयानुसार या विभागार्फत कार्यवाही करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने बीड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १ जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध न करून देणे त्या संदर्भात महाराष्ट्र स्थानिक लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखणे, सेवापुस्तिकामध्ये नोंद घेण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, संबंधित कर्मचाऱ्यांकडून दंड वसूल करून त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नोंद घेतलेली आहे. तसेच त्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यावर कारवाई केलेली आहे.

या उत्तरावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी लेखापरिक्षणाच्या संदर्भात म्हणून खाते प्रमुखांना पत्र देतात. त्यानुसार खाते प्रमुखांची जबाबदारी आली. परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करीत आहेत. त्या कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी केल्यावर किंवा अपील केल्यावर संबंधित कर्मचारी सुटतो. जिल्हा परिषदेची चुकीची कारवाई असल्यामुळे त्याची सुटका होते. जिल्हा परिषदेने नक्की कोणावर आरोपपत्र केले पाहिजे हे स्पष्ट नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखापरिक्षणा संदर्भात लेखापरिक्षकांचे पत्र जाते. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी विभाग प्रमुखांना लेखापरिक्षणाबाबत कळवितात.विभाग प्रमुख प्रत्येक कर्मचाऱ्यास पत्र देत नाही, ते फक्त सर्व कर्मचाऱ्यांना लेखापरिक्षणाच्या वेळी उपस्थित राहण्यास सांगतात. लेखापरिक्षणाच्या वेळी संबंधित कर्मचारी उपस्थित असताना त्यांनी लेखापरिक्षणास कागदपत्रे दाखविली नाहीत तर त्यावेळी विभाग प्रमुखांनी ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लक्षात आणून त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे होते. परंतु तसे काहीही न करता आता कारवाई करण्यात येत आहे. आपल्या अधीनस्थ असलेल्या कर्मचाऱ्यांकडून काम करून घेण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची होती. सन २०१२-२०१३ मधील प्रकरण आहे आणि त्याची वसुली सन २०१७-२०१८ मध्ये करण्यात येत आहे. समितीने भेट दिली म्हणून ही वसुली झालेली आहे. अन्यथा ती वसुली झाली नसती. आपण नेहमी खालच्या कर्मचाऱ्यावर दंडाची कारवाई किंवा इतर कारवाई करता. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई न करता त्यांना सोडून देतात.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, प्रत्येक रेकॉर्डसाठी एक कर्मचारी नियुक्त केलेला आहे. त्याच्यावर ती जबाबदारी आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, जर एखाद्या कर्मचाऱ्याने लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत तर विभाग प्रमुखांनी त्याचवेळी त्या कर्मचाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. परंतु

ज्यावेळी आक्षेप येतो त्यावेळी जिल्हा परिषदेतर्फे त्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येते ही जबाबदारी विभाग प्रमुखांची आहे. त्यावेळी त्या कर्मचाऱ्यास संरक्षण दिले जाते. जर कर्मचारी लेखापरीक्षणाच्यावेळी उपस्थित असतील आणि त्यांनी कागदपत्रे सादर केली नसतील तर त्याचवेळी संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई का करण्यात आली नाही.

यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विदित केले की, सन २०१२-२०१३ मधील हा विषय आहे. त्या संदर्भातील कारवाई झालेली आहे. संबंधितांकडून वसुली केलेली आहे. यापुढे ही काळजी घेण्यात येईल. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, प्रत्येक नस्तीचा एक परिरक्षक असतो. ती नस्ती त्याच्या ताब्यात असते. जेव्हा तो कर्मचारी दुसऱ्याकडे कार्यभार देतो त्यावेळी त्याने संपूर्ण यादीसह कार्यभार देणे अपेक्षित आहे. लेखापरिक्षणाच्या वेळी जी नस्ती सापडली नाही तर त्या संदर्भातील जबाबदारी त्या कर्मचाऱ्यावर असते.

या खुलाशानंतर समितीने विचारणा केली की, ही बाब कार्यालय प्रमुखांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्या कर्मचाऱ्याचे पगार का थांबविला नाही, त्या कर्मचाऱ्याने कामात कसूर केली हे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात कसे आले नाही, पगार थांबविणे योग्य नाही तर त्या कर्मचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस का दिली नाही, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षक दोन-तीनवेळा भेटी देतात, संधी देतात. संधीमध्ये नस्ती मिळून जाते.

यासंदर्भात समितीने पूर्वी देखील उदाहरण दिले होते. पेट्रोलपंपाची तपासणी झाल्यानंतर तेथील शौचालय खराब होते. तेव्हा डिलरवर दंडाची कारवाई झाली. पेट्रोल पंपावरील व्यवस्थापकावर किंवा कर्मचाऱ्यावर दंडाची कारवाई झाली नाही. विभाग प्रमुखांवर कारवाई करावी असे समितीचे मत आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामविकास विभागातर्फे पुन्हा परिपत्रक काढण्यात येईल. समितीमध्ये हा विषय येण्याची गरज नाही. समितीमध्ये विषय आला म्हणजे पाच-सहा वर्षे काही कारवाई केली नाही असा त्याचा अर्थ होतो. सन २०१२-२०१३ मधील लेखापरिक्षण आहे. त्या संदर्भातील कारवाई सन २०१७-२०१८ मध्ये होत आहे हे योग्य नाही. जर वेळीच कारवाई केली असती तर समितीसमोर हा मुद्दा उपस्थित झाला नसता. मेमोरीडींगच्या पूर्वी फाईल मिळाली पाहिजे अन्यथा दंड होईल असे कळविण्यात येईल. नंतर समितीसमोर येऊन दंड झाला नाही सांगणे हे योग्य नाही.

तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांनी निदर्शनास आणून दिले की, कर्मचाऱ्याकडे लेखापरिक्षकास कागदपत्रे मिळाली आहेत की नाहीत इतकी विचारणा केली तरी माहिती मिळू शकते. जर त्या कर्मचाऱ्याने वेळीच कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत तर त्याच वेळी कर्मचाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. पंरतु एकदा नेमून झाल्यांनतर विभाग प्रमुखांची जबाबदार राहील. मेमोरिडींगपर्यंत लिपिकावर कारवाई झाली पाहिजे एकदा मेमोरिडींग झाल्यानंतर ती विभाग प्रमुखाची जबाबदारी राहील. मेमोरिडींग होईपर्यंत अभिलेखे मिळत नसेल तर खातेप्रमुख जबाबदार राहील असे परिपत्रक काढले तर त्याचा जास्त चांगला परिणाम होईल. जर लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून न दिल्यास त्यासाठी त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार असतात.

## अभिप्राय व शिफारशी

बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. सन २०१२-१३ या वर्षाचे एकूण १४ परिच्छेदांच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

यासंदर्भात समितीने विभागीय सचिव तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली असता साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, लेखापरिक्षणास कागदपत्र उपलब्ध न करून दिल्याप्रकरणी संबधित कर्मचाऱ्यांकडून दंड वसूल करून त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नोंद घेतलेली आहे तसेच त्यांना सक्त ताकीद दिलेली आहे. तथापि, उक्त कारवाई विभाग प्रमुखांवर न करता संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केलेली आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत तर विभाग प्रमुखांनी त्याचवेळी त्या कर्मचाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. परंतु ज्यावेळी आक्षेप येतो त्यावेळी जिल्हा परिषदेतर्फे त्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येते ही जबाबदारी विभाग प्रमुखांची आहे. त्यावेळी त्या कर्मचाऱ्यास संरक्षण दिले जाते. लेखापरिक्षणाच्या वेळी संबंधित कर्मचारी उपलब्ध असताना त्यांनी लेखापरिक्षणास कागदपत्रे दाखविली नाहीत तर त्यावेळी विभाग प्रमुखांनी ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून संबधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे आवश्यक होते. परंतु तसे काहीही न करता आता कारवाई करण्यात येत आहे. सन २०१२-२०१३ मधील प्रकरण आहे आणि त्याची वसुली सन २०१७-२०१८ मध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. समितीने जिल्हा परिषदेला भेट दिल्यामुळे ही वसुली झालेली आहे. अन्यथा ही वसुली झाली नसती असे समितीचे स्पष्ट मत आहे.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखापरिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करून दिले जात नाहीत. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, **''जी कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखापरिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,००० यापैकी जास्त असणाऱ्या रक्कमे इतक्या दंडात्मक रक्कमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी''** अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रक्कमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणामध्ये अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत, त्या प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करून दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. **बीड जिल्हा परिषदेमध्ये सन २०१२-१३ या वर्षामध्ये एकूण १४ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्यावेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २०१२-१३ मधील परिच्छेदासंदर्भात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ६ मधील पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसुल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, बीड

## सर्वसाधारण शिफारशी

### (१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रक्कमा जमा करण्याबाबत :-

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः बीड जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/ अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांची निधीची तरतूद करून मिळविला जातो मात्र असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती देखीलजमा केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कम वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमेवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून बीड जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :-**

समितीने बीड जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखापरिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखापरिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखापरिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखापरिक्षक सुरूवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखापरिक्षणाचे वेळी लेखापरिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,००० इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार बीड जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करु नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कारवाई केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कारवाई केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती**

महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तिंवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

## परिशिष्ट (अ)

## शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके

(परिशिष्ट ४.१)

## प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, विभाग, औरंगाबाद

---

वाचा :

१. अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२. अपंगाच्या विशेष शाळांकरीता शाळा संहिता १९९७
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीटी-२०१३/प्रक्र.२०७/अ.क्र.१ दिनांक २७ जानेवारी, २०१४
४. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीटी-२०१२/प्रक्र.२०७/अ.क्र.१, दिनांक १०.०६.२०१४
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांचा चौकशी अहवाल क्रमांक ३०६, दिनांक ०५.०३.२०१५
६. या कार्यालयाचे सुनावणी नोटीस क्रमांक ९८७, दिनांक २४.०४.२०१५
७. प्रस्तूत कार्यालयात झालेली सुनावणी दिनांक ०६.०५.२०१५

---

क्र.प्राउसकविऔ/नियोजन/मुकबधीर/मतिमंद विद्यालय/नोंप्रप रद्द/२०१५-१६/१०८५ औ.बाद, दि-१३.५.२०१५

### :: आ दे श ::

राजे संभाजी बहूउद्देशिय सेवाभावी संस्था, दगडी शहाजानपुर ता.जि.बीड संचलित रुख्माई गोविंद मुकबधीर /मतिमंद निवासी विद्यालय, बीड. या प्रवर्गाच्या विशेष शाळेस अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ च्या तरतूदी प्रमाणे मा. आयुक्त अपंग कल्याण महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडे मतीमंद शाळा नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक अे -२३७, दिनांक ०५.०२.२००९ व मुकबधीर शाळा नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक अे- २३१, दिनांक ०२.०२.२००९ देण्यात आलेले आहे.

संदर्भिय क्रमांक ३ व ४ च्या शासन निर्णयानुसार सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, औरंगाबाद यांना अपंग व्यक्ती अधिनियमातील नियम ५० नुसार नोंदणीप्रमाणपत्र देणेसाठी तसेच त्यांचे नुतनीकरणांस व नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यास सक्षम अधिकरी म्हणुन घोषित करण्यात आलेल आहे.

संदर्भ क्रमांक ५ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी त्रिस्तरीय समितीने नेमुन राजे संभाजी बहूउद्देशिय सेवाभावी संस्था, दगडी शहाजानपुर ता.जि.बीड संचलित रुख्माई गोविंद मुकबधीर /मतिमंद निवासी विद्यालय, बीड. यांची चौकशी अहवालानुसार निर्णयास्तव प्रस्तूत कार्यालयात सादर केला आहे तसेच सदर संस्थेस नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्याचा उद्देश १९९५ च्या कायद्यान्वये साध्य होत नाही, सदरील शाळा ही

शासनाच्या ध्येय धोरणाप्रमाणे चालविली जात नाही तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे व संस्था अध्यक्ष सचिव यांच्यामध्ये समन्वय नसल्याने मतिमंद व मुकबधीर विद्यार्थ्यांचे सामाजिक, शैक्षणिक व व्यवसायीक पुर्नवसनाच्या दृष्टीकोनातून नुकसान होत आहे [illegible] देवून सदरील संस्थेच्या शाळेची मान्यता [illegible] विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित व कर्मचारी यांचे भवितव्य विचारात घेता इतर सक्षम संस्थेस तातडीने शाळा हस्तांतरीत करुन संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी जिल्हा स्थानिक लेखा परिक्षण अधिकारी यांच्या मार्फत करण्यात यावी असे सुचविले आहे.

सदरील मुंख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी सुचविलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्तूत कार्यालयाने संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रांन्वये सदर शाळेची नोंदणी प्रमाणपत्र रद्द का करण्यात येवू नये याबाबत सुनावणी नोटीस बजावून दिनांक ०६.०५.२०१५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणी दरम्यान जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे प्रतिनिधी श्री. व्हि.एल.उणवने (स.कनि) व संस्थेमधील कर्मचारी हे हजर होते. सदर सुनावणीसाठी श्री. लांडे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता तसेच संस्थेतर्फे कोणीही हजर राहील नाही.

सुनावणी दरम्यान जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांचे प्रतिनिधी यांनी पान क्रमांक १ ते ३० पानांची कागदपत्रे सादर केली असून त्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे सांगितले. संस्थेने आपला खुलासा दिनांक ०५.०५.२०१५ रोजी प्रस्तूत कार्यालयाच्या आवक-जावक विभागात दुसऱ्या व्यक्ती मार्फत सादर केला आहे. त्यानुसार दिनांक ०६.०५.२०१५ च्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही. व सदरील प्रकरणा बाबत सविस्त खुलासा देणेसाठी मुदतवाढ मिळणेसाठी [illegible] व सदरील खुलाशाच्या अनुषंगाने पान क्रमांक १ ते २० कागदपत्र सादर केलेली आहे. सुनावणीच्या दरम्यान सदरील संस्थेतील कर्मचारी यांनी सुध्दा लेखी म्हणणे पान क्रमांक १ ते ६२ सुनावणी दरम्यान दाखल केली आहे.

उपस्थितांनी सादर केलेले म्हणणे, तपासणी अहवाल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी सादर केलेला अभिप्राय यावरुन कर्मचारी व संस्थेमध्ये समन्वय नसल्याने सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे विशेष शिक्षण देण्याचा उद्देश सफल होत नसल्याचे स्पष्ट होत आहे. तेंव्हा अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ अन्वये शाळेस प्रदान करण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे योग्य राहील या निष्कर्षाप्रत मी येत असून सक्षम अधिकारी तथा प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण या नात्याने मी खालील प्रमाणे आदेशित करीत आहे.

## :: आ दे श ::

१. राजे संभाजी बहूउद्देशिय सेवाभावी संस्था,दगडी शहाजानपूर ता.जि.बीड संचलित [illegible] गोविंद मुकबधीर/मतिमंद निवासी विद्यालय, बीड. [illegible] प्रवर्गातील विशेष शाळेस देण्यात आलेले मतीमंद शाळा नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक अे -२३७, दिनांक ०५.०२.२००९ व मुकबधीर शाळा नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक

अे- २३१, दिनांक ०२.०२.२००९ हे अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग अधिनियम १९९५ च्या कलम ५३ अन्वये या आदेशाच्या दिनांकापासून रद्द करण्यात येत आहे.

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी या आदेशाची एक प्रत संस्थेस बजावून संस्थेकडू मुळ मतीमंद शाळा नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक अे -२३७, दिनांक ०५.०२.२००९ व मुकबधीर शाळ नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक अे- २३१, दिनांक ०२.०२.२००९ जप्त करुन आपल्या दफ्तरी ठेवावे.

३. नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले असल्यामुळे संस्थेने प्रवेशित विद्यार्थ्यांना पालकांच्या ताब्यात द्यावे अथवा त्यांच संमतीने इतर शाळेत पाठवावे.

४. सदर आदेशाने व्यथीत झाल्यास संस्थेस विहीत मुदतीत सक्षम न्यायालयात / शासनाकडे अपील सादर करर येईल.

सदरचे आदेश आज रोजी दिनांक १३.०५.२०१५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित केले.

सक्षम अधिकारी तथा,
प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,
औरंगाबाद

प्रति :

१. अध्यक्ष/ सचिव,
राजे संभाजी बहूउद्देशिय सेवाभावी संस्था, दगडी शहाजानपुर ता.जि.बीड संचलित
रुख्माई गोविंद मुकबधीर /मतिमंद निवासी विद्यालय, बीड.

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर :

१. मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
३. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड. यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव रवाना.

सक्षम अधिकारी तथा.
प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,
औरंगाबाद

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद,बीड

# परिशिष्ट (ब)

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक १० जानेवारी, २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(११) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद पदाधिकारी**

(१) श्रीमती सविता गोल्हार, अध्यक्षा, जिल्हा परिषद, बीड
(२) श्रीमती जयश्री मस्के, उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, बीड
(३) श्री.संतोष हंगे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, बीड
(४) श्री.राजेसाहेब देशमुख, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, बीड
(५) श्री.युद्धाजित पंडित, सभापती, अर्थ व बांधकाम समिती, जिल्हा परिषद, बीड
(६) श्रीमती शोभा दरेकर, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, बीड
(७) श्री.अशोक लोढा, सदस्य, जिल्हा परिषद, बीड
(८) श्री. ज्ञानेश्वर प्रभाकर कोकाटे, सभापती, पंचायत समिती, बीड

**स्थानिक निधी लेखा संचालनालय**

श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री. श्याम पटवारी, सहाय्यक आयुक्त (चौकशी), आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री.धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.सुरेश केंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री.धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(४) डॉ.सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग
(५) श्री.मधुकर वासनिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(६) श्री.उदय साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग
(७) डॉ.आर.जी.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(८) श्री.भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(९) श्री.ए.एस.बोबलगे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(१०) श्री.एस.बी.स्वामी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १
(११) श्री.एस.के.करंजे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २
(१२) डॉ.संतोष शिवाजी पालवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१३) श्री.सुनिल खंडारे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
(१४) श्री.प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
(१५) श्री.रविंद्र तुरुकमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(१६) श्री.के.ना.कुटे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(१७) श्री.डी.पी.बिटके, कृषि विकास अधिकारी
(१८) श्री.रा.र. गायकवाड, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) विभाग
(१९) श्रीमती एम.एस.कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर
(२०) श्री.एस.बी.सोनवणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर (का)
(२१) श्री.एन.पी.राजगुरु, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई
(२२) श्री.एस.पी.भागवत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड
(२३) श्री.डी.बी.गिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई
(२४) श्री.ए.बी.गुंजकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज
(२५) श्री.विठ्ठल नागरगोजे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी
(२६) श्री.अे.आर.सरगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी
(२७) श्री.जे.वाय.स्वामी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा
(२८) श्री.एस.एन.केंद्रे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील बीड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक ११ जानेवारी, २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१२) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री.धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.सुरेश केंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री.धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(४) डॉ.सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग
(५) श्री.मधुकर वासनिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(६) डॉ.आर.जी.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री.भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(८) श्री.ए.एस.बोबलगे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग
(९) श्री.एस.बी.स्वामी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १

(१०)श्री.एस.के.करंजे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २
(११) डॉ.संतोष शिवाजी पालवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१२) श्री.सुनिल खंडारे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
(१३) श्री.प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
(१४) श्री.रविंद्र तुरुकमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(१५) श्री.के.ना.कुटे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(१६) श्री.डी.पी.बिटके, कृषि विकास अधिकारी
(१७) श्री.रा.र. गायकवाड, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) विभाग
(१८) श्रीमती एम.एस.कांबळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर
(१९) श्री.एस.बी.सोनवणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर (का)
(२०) श्री.एन.पी.राजगुरु, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई
(२१) श्री.एस.पी.भागवत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड
(२२) श्री.डी.बी.गिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई
(२३) श्री.ए.बी.गुंजकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज
(२४) श्री.विठ्ठल नागरगोजे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी
(२५) श्री.अे.आर.सरगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी
(२६) श्री.जे.वाय.स्वामी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा
(२७) श्री.एस.एन.केंद्रे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात बीड जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १२ जानेवारी, २०१८**
**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, बीड**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(६) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(९) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(११) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

श्री.श्याम पटवारी, सहायक आयुक्त (चौकशी), आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री.धनराज निला, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.सुरेश केंद्रे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(३) श्री.धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग)
(४) डॉ.सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) विभाग
(५) श्री.मधुकर वासनिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(६) डॉ.आर.जी.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री.भगवान सोनवणे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(८) श्री.ए.एस.बोबलगे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(९) श्री.एस.बी.स्वामी, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक १

(१०) श्री.एस.के.करंजे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्रमांक २

(११) डॉ.संतोष शिवाजी पालवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१२) श्री.सुनिल खंडारे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१३) श्री.प्रशांत भामरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१४) श्री.रविंद्र तुरुकमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) श्री.के.ना.कुटे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१६) श्री.डी.पी.बिटके, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री.रा.र. गायकवाड, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) विभाग

(१८) श्रीमती एम.एस.कांबळे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर

(१९) श्री.एस.बी.सोनवणे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर (का)

(२०) श्री.एन.पी.राजगुरु, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई

(२१) श्री.एस.पी.भागवत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बीड

(२२) श्री.डी.बी.गिरी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबेजोगाई

(२३) श्री.ए.बी.गुंजकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, केज

(२४) श्री.विठ्ठल नागरगोजे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडवणी

(२५) श्री.अे.आर.सरगर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आष्टी

(२६) श्री.जे.वाय.स्वामी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटोदा

(२७) श्री.एस.एन.केंद्रे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील बीड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(२) डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(३) श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार विभाग
(४) श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री.एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(६) श्री.सतिश सोनी, आयुक्त, सहकार विभाग
(७) श्री.एस.एल.अहिरे, संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती
(८) श्री.भा.र.गावित, सहसचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभाग
(९) श्री.ला.रा.गुजर, सहसचिव, महिला व बालविकास विभाग
(१०) श्री.र.प्र.आटे, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग
(११) श्री.गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१२) श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१३) श्री.र.आ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(१४) श्री.संतोष कराड, अवर सचिव, ग्रामविकास विभाग
(१५) श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग
(१६) डॉ.विजय कुंदेवाड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय
(१७) डॉ.एस.एन.जाधव, उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय
(१८) श्री.गो.भ.शिंदे, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(१९) श्री.र.वा.सरफरे, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री.अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(२) श्री.डी.व्ही.निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(३) श्री.धनवंत माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, बीड

(४) डॉ.सुनिल भोकरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, बीड

(५) डॉ.आर.बी.पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

(६) श्री.सुनील खंडारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापापु), जिल्हा परिषद, बीड

(७) श्री.सी.एस.केकान, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक), जिल्हा परिषद, बीड

(८) श्री.विष्णु वाघमोडे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड

(९) श्री.रा.र.गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड

(१०) श्री.चंद्रकांत गजभिये, मु.अ. व वि.का.अ.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी-पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सहकार विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, आयुक्त, सहकार विभाग, संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती, सहसचिव, विमुक्त जाती भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभाग, सहसचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उप निबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ८ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(३) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, कोंकण भवन, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(३) श्री.चंद्रशेखर जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) श्रीमती शुभांगी शेठ, सहसचिव, वित्त विभाग
(५) श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(६) श्री.म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग
(७) श्री.विजयकुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री.अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.डी.व्ही.निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.डी.आर.माळी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
(४) डॉ.सुनिल मोकाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)
(५) श्री.के.ना.कुटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(६) श्री.एस.एम.साळवे, कृषी विकास अधिकारी
(७) श्री.एम.एस.वासनिक, समाजकल्याण अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

**सन** २०१२-१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सहसचिव, वित्त विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची उर्वरित साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ९ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री.रा.बा.पानसे, सचिव (प्र व स), जलसंपदा विभाग
(२) श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(३) श्री.धनराज निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
(४) श्री.आर.एस.काळे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(५) श्री.एम.एस.वासनिक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(६) श्रीमती सु.प्र.अहिरराव, सहायक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(७) श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग
(८) श्री.दि.रा.टकले, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

**सन** २०१२-१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी सचिव (प्र व स), जलसंपदा विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, सहायक संचालक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची उर्वरित साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ जानेवारी, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.
(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव
(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री.प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव**

(१) श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(३) श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(४) श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, बीड**

(१) श्री.अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री.धनराज निला, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री.आर.एस.काळे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
(४) श्री.एम.एस.वासनिक, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात बीड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांची उर्वरित साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २७ जून, २०१९**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :-**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(३) डॉ.देवराव होळी, वि.स.स.
(४) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(५) श्री.किशोर पाटील, वि.स.स.
(६) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(७) श्री.भारत भालके, वि.स.स.
(८) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(९) श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.
(१०) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(११) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(१२) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

(१) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(३) श्री.किशोर दराडे, वि.प.स.
(४) श्री.निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.विलास आठवले, सहसचिव (२) (का.)
श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
श्री.नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत तिसाव्या व एकतीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.